cmyk

## संपादकीय

### बलाढ्य भारतापुढे पाकिस्तान दुबळाच...

भारताने पाकिस्तानवर आणि काश्मिरमधे ७ मेच्या पहाटे लष्करी कारवाई केली. या लष्करी कारवाईला भारताने 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव दिलं आहे. भारताचं असं म्हणणं आहे की हे हल्ले 'दहशतवादी ठिकाणांवर केले आहेत.' भारतानं यावेळी पाकिस्तानात घुसून हल्ला करण्याऐवजी आपल्याच क्षेत्रातून क्षेपणास्त्र सोडली आहेत. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, यावेळी भारताने पाकिस्तानची मुख्य भूमी पंजाबमधून हल्ला केला आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### नरेंद्र मोदींचा इस्त्रोवर कौतुकाचा वर्षाव

दिल्ली । वृत्तसेवा

इस्रोने एका मिशनमध्ये एकाच वेळी १०० सॅटेलाईट सोडण्याची कामगिरीही केली, अशी कौतुकाची थाप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. आमच्या सॅटेलाईटद्वारे प्रत्येक भारतीयांच्या सुरक्षेची काळजी घेत आहे. इंडियाकडे २५० हून अधिक स्पेस स्टार्ट आहेत. आमच्याकडे आधुनिक सॅटेलाईट टेक्नॉलॉजी आहे. महिला शास्त्रज्ञांकडून आमच्या मिशनचे नेतृत्व केले जात आहे, ही मोठी गोष्ट आहे, असेही मोदी म्हणाले.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८ | गुरूवार, दि.८ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# उष्णतेच्या लाटेमुळे पावसाचे गणित बदलणार

## भारतात नेमका कधी दाखल होणार मान्सून?; शेतकऱ्यांची चिंता वाढली

मुंबई । प्रतिनिधी

नेमकं मान्सूनचे आगमन कधी होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर एप्रिल हीट च्या स्थितीमुळे यावर्षी पावसाचे गणित बदलणार असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. त्यामुळे यंदा लवकर मान्सून दाखल होणार असल्याने शेतकऱ्यांची काही प्रमाणात काह होईना चिंता वाढणारे चित्र आहे.

सध्या देशातील वातावरणात बदल होत आहे. काही भागात उष्णतेची लाट असल्याचे जाणवत



आहे, तर काही भागात अवकाळी पाऊस पडत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, अशातच नेमकं मान्सूनचे आगमन कधी होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर एप्रिल हीटच्या स्थितीमुळे यावर्षी पावसाचे गणित बदलणार असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, २० मे रोजी मान्सून अंदमानच्या सागरात येण्याची शक्यता आहे, तर ३० मे ते १ जून दरम्यान, मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी देशभरात मोठ्या प्रमाणात उष्णता होती. ५० दिवसांपेक्षा जास्त दिवस यावर्षी उष्णतेची लाट सक्रिय होती. त्यामुळं हिंदी महासागर आणि बंगालच्या उपसागरातील पाणी प्रचंड तापल्याने बाष्पीभवनाचा वेगही वाढला आहे. त्यामुळं देशभरात बाष्पयुक्त ढग तयार झाले आहेत. परिणामी यंदा लवकर मान्सून येण्याची शक्यता आहे.

### राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

हवामान विभागाने पुढील ४ ते ५ दिवसाचा हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील ४ ते ५ दिवस राज्यात तीव्र हवामानाचा इशारा कायम आहे. राज्यातील काही भागात मेघगर्जनेसह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्याच्या काही भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच कताही भागात गारपीट होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

दरम्यान, दरवर्षीपेक्षा लवकर मान्सून दाखल होणं हा शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा ठरणार आहे. कारण सध्या अनेक भागात पाण्याची बिकट अवस्था आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळं शेतीसाठी, पिण्यासाठी जनावऱ्यांच्या चाऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. असा स्थितीत जर मान्सून लवकर दाखल झाला तर शेतकऱ्यांसाठी फायद्याचा ठरणार आहे. दरम्यान, तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, २० मे रोजी मान्सून अंदमानच्या सागरात येणार आहे. त्यानंतर १ जूनला केरळमध्ये मान्सनू दाखल होणार आहे.

## ऑपरेशन सिंदुर हायलाईटस्

### पाककडून पुढेही हल्ले होऊ शकतात–मिसरी

भाराताविरोधात पुढेही हल्ले होऊ शकतील, त्यामुळे त्यांना रोखणे आणि प्रत्युत्तर देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे संकेत गुप्तचर यंत्रणांनी दिले, अशी माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी दिली.

### पाकिस्तानाकडून हल्ल्याबाबत निवेदन जारी

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानकडून निवदेन जारी करण्यात आले आहे. पाक लष्कराच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यात ८ लोकांचा मृत्यू झाला असून ३३ लोक जखमी झाले आहेत. पाकिस्तानात ६ ठिकाणी २४ क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले.

### श्रीनगर एअरपोर्ट इंडियन एअर फोर्सने ताब्यात घेतला

श्रीनगर एअरपोर्ट इंडियन एअर फोर्सने ताब्यात घेतला आहे. पुढील आदेशापर्यंत सर्व उड्डाण रद्द करण्यात आली आहेत. श्रीनगरसह भारतातील ९ एअरपोर्ट भारताने नागरी उडाणासाठी बंद केली आहेत.

### ऑपरेशन सिंदूरनंतर अमेरिकेचा पाकिस्तानला थेट इशारा

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर अमेरिकेने पाकिस्तानला इशारा दिला आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री रुबियो यांनी पाकला थेट इशारा दिला आहे. कुठलही प्रत्युतर देऊ नका असे पाकिस्तानला सांगितले आहे.

### ऑपरेशनमध्ये रॉचा नेमका रोल काय?

भारताच्या पराक्रमी सैन्याने पाकिस्तानातील ४ आणि पाकव्याप्त काश्मीरमधील पाच तळांना टार्गेट केले आहे. भारताची गुप्तचर यंत्रणा रॉने सर्व टार्गेटस निवडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुठल्या–कुठल्या ठिकाणी हे स्ट्राइक केले? आणि ते इंटरनॅशनल बॉर्डरपासून किती लांब आहेत? याची वास्तव माहिती दिली होती.

### सैन्य दलाची कामगिरी कौतुकास्पद–फडणवीस

हल्ल्यानंतर, जय हिंद, भारत माता की जय अशी पोस्ट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून माध्यमांशी बोलताना फडणवीसांनी पंतप्रधान मोदींसह सैन्य दलाचे आभार मानले.

### आज सगळा देश एअर फोर्सच्या पाठीमागे–पवार

जो काश्मीरचा भाग पाकिस्तान घेतला तिथं हल्ला केला. या ठिकाणी दहशतवाद्यांचे कॅम्प आहेत, तिथं दारूगोळा ठेवला जातो. पाकिस्तानची बॉर्डर आपण ओलांडून गेलो नाही ती काळजी हवाई दलाने घेतली. आज सगळा देश एअर फोर्सच्या पाठीमागे आहे, अशी भूमिका शरद पवार व्यक्त केली आहे.

### वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करू नये–एकनाथ शिंदे

पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. पाकिस्तानने भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करू नये. यापुढेही लष्कर हे दहशतवादी हल्ले नेस्तनाबूत करेल, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.

# अवघ्या २५ मिनिटांत खेळ खल्लास!

## अखेर पाकची जिरवलीच; १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार








नवी दिल्ली । वृत्तसेवा

**भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला आहे. या ऑपरेशनअंतर्गत भारताने पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानच्या हद्दीतील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करण्यात आले आहे. अखेर उठसुठ वळवळ करणाऱ्या पाकिस्तानची भारताने जिरवली असून अवघ्या २५ मिनिटांत खेळ खल्लास केला आहे. भारताच्या या हल्ल्यात जवळपास १०० दहशतवाद्यांचा खात्मा झाला आहे. या हल्ल्यानंतर जगभरातून भारताला पाठिंबा मिळत असून पाकिस्तान मात्र एकाकी पडला आहे. सिंदुर ऑपरेशन फत्ते झाल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दहशतवाद्यांच्या विरोधातील भुमिका पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.**

जम्मु–कश्मिरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी हल्ला करीत २७ भारतीयांना निशाणा बनवले होते. यानंतर संपुर्ण देशात संतापाची लाट निर्माण झाली होती. दोन्ही देशात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. भारताने ७ मे रोजी देशात मॉक ड्रिल घेण्याची घोषणा केली होती. मात्र तत्पुर्वी ६ मे रोजीच्या मध्यरात्रीनंतर १.०५ ते १.३० वा. दरम्यान पीओके आणि पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळावर हल्ले केले. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पीओके आणि पाकिस्तानात असलेल्या जैश ए मोहम्मद, लष्कर ए तैयबा आणि हिजबूल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटांच्या तळांना लक्ष्य करण्यात आले. भारताने या मोहिमेअंतर्गत एकूण ९ ठिकाणी हवाई हल्ले केले आहेत. याच हल्ल्यांबाबत अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हेन्स यांनी भाकित केले होते. त्यांचे हे भाकित आता खरे ठरले आहे. पहलगामवर हल्ला झाल्यानंतर व्हेन्स यांनी भारत या हल्ल्याचा बदला घेईल आणि दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करेल, असा अंदाज व्यक्त केला होता. हा अंदाज आता खरा ठरला आहे. तर या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाचा डंका पुन्हा एकदा जगभर वाजत असल्याचे दिसत आहे.

### मसूद अझरचे कुटुंब ठार; पण तो होता कुठे?

कोटलीमध्ये मरकज अब्बास येथे भारतीय सैन्याने केलेल्या मिसाईल हल्ल्यात मसुद अझरचे कुटुंब ठार झाले आहे. हल्ला झाला तेव्हा त्यात मसुद अझरच्या कुटुंबातील १४ लोक ठार झालेले आहेत. मात्र हल्ल्याच्या वेळी तो मरकज अब्बासमध्ये होता का? याबद्दल कोणतीही माहिती हाती लागलेली नाही. त्यामुळे सध्या भारतीय सैन्याकडून मसुद अझरचा शोध सुरू आहे.

### काय केला पाकिस्तानने दावा?

पाकिस्तानच्या आर्मीकडून असा दावा करण्यात आला आहे की, भारताने सर्जिकल स्ट्राईकनंतर मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास नौसेरी धरणावर बॉम्ब फेकला, यामुळे धरणाचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाल्याचा दावा देखील पाकिस्तानने केला आहे.

### १०० पेक्षा जास्त दहशतवाद्यांचा मृत्यू

भारताने मध्यरात्रीच्या सुमारास पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक केला. दहशतवाद्यांचे एकूण ९ अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. या हल्ल्यामध्ये १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या हल्ल्यात तीन ते चार दहशतवाद्यांचे म्होरके मारले गेले आहेत.

### अमेरिका, रशिया, इस्त्राईलचा भारताला पाठिंबा

भारताच्या कारवाईनंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यात चर्चा झाली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी विविध देशांच्या एनएसएसोबत चर्चा केली. त्यामध्ये अमेरिका, इंग्लंड, सौदीच्या सुरक्षा अधिकाऱ्यांसोबत डोवाल यांची चर्चा झाली. यूएई, जपानच्याही अधिकाऱ्यांशीही संवाद साधला. तसेच अमेरिका, रशिया आणि इस्त्राईलने भारताला पाठिंबा देत पाकिस्तानला सुनावले आहे.

### राफेल, सुखोईने मोहिम केली फत्ते

पाकिस्तानची ९ लक्ष्य बेचिराख करण्यासाठी भारताने राफेल आणि सुखोई ३० एमकेआय या विमानांचा वापर केला. राफेल विमानांनी अत्याधुनिक स्काल्प मिसाईल्स डागली. अतिदूरच्या लक्ष्यांवर मारा करण्यासाठी स्काल्प ही क्षेपणास्त्र वापरण्यात आली. स्काल्प क्षेपणास्त्रांद्वारे ५०० किमी अंतरावरील लक्ष्यांचा वेध घेतला जातो. एक हजार किमी प्रतीतास या वेगाने स्काल्प मिसाईल्स मारा करतात. विशेष म्हणजे शत्रूच्या रडारवर दिसत नसल्याने स्काल्प मिसाईल्स आली तरी पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम कार्यान्वितच झाली नाहीत. त्यामुळे पाकिस्तान ज्या एअर डिफेन्स सिस्टीमच्या वल्गना करत होता त्या फोल ठरल्या.

### पिक्चर अभी बाकी है –डोभाल

पहलगाममध्ये हल्ला करणं किती महागात पडू शकते, याची प्रचिती आता पाकिस्तानला आली आहे. पण हा हल्ला म्हणजे सर्व काही नाही. ही तर सुरुवात आहे. पिक्चर अभी बाकी है भारताने अजून पुढचा प्लान आखला आहे. देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी पाकिस्तानला निर्वाणीचा इशाराही दिला आहे.

### मोदींचे परिस्थितीवर बारीक लक्ष, रात्रभर ऑपरेशनची मॉनिटरिंग

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी रात्रभर सतत या ऑपरेशनची मॉनिटरिंग करत होते. पीएम मोदींनी सकाळी ११ कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीची बैठक बोलावली होती. सर्व परिस्थितींवर मोदीचे बारीक लक्ष होते.

### भारताने आमची मजाक उडवली–शहबाज शरीफ

भारताने केलेल्या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानने तातडीने आपल्या सुरक्षा विभागाची एक उच्चस्थरीय बैठक बोलावली. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली, या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि लष्कर प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी शहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा पोकळ धमकी दिली आहे. भारताने फक्त आमच्यावर हल्ला केला नाही, तर आमची मजाक उडवली असल्याचे ते म्हणाले.

# बीड शहराच्या संदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

## पावसाळ्यापूर्वी स्वच्छता कामे, टॅक्स रिव्हीजनसह, नगर रोडवरील रस्ता क्रॉसिंग या महत्वाच्या मुद्यांवर झाली सविस्तर चर्चा

बीड । प्रतिनिधी

**पावसाळ्याच्या पूर्वी शहरातील नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन करणे तसेच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) करण्यासाठी सुव्यवस्थित करणे तसेच बीड शहरातील नगर रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यांमध्ये रस्ता क्रॉसिंग अशा विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.७) रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेतली.**




बीड शहरात पावसाळ्याच्या अगोदर नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी कामे होणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरिकांचे आरोग्य आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यासोबतच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत सुव्यवस्थित नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यासोबतच नगर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यादरम्यान सर्व शासकीय कार्यालये आहेत. परंतु याठिकाणी एकही रस्ता क्रॉसिंग नाही त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बीड शहाराच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. दरम्यान पावासाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे करण्यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत तसेच नगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) च्या संदर्भात आराखडा तयार करून त्याचेही सुव्यवस्थित नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका

◀◀ पान २ वर

# बीडच्या पाणी प्रश्नावर पालकमंत्र्यांसह नगरविकास मंत्र्यांचा उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम याचा उपरोधीक टोला

बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी अहोरात्र भटकंती करावी लागत असून नगरपरिषदेच्या ढिसाळ आणि नियोजन शून्य कारभारामुळे बीडकरांना माजलगाव तलावात पाणी उपलब्ध असताना घोटभर पाणी मिळणे मुश्किल झाले आहे अशा पाणी संकटावेळी संवेदनहीन नगरपालिका प्रशासनाला पाण्यासाठी जनता टाहो फोडत असताना कधी जाग येणार आहे?**



मोठा गाजावाजा करून बीडला पालकमंत्री म्हणून आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ बीडला येऊन प्रशासनाची बैठक घेऊन पाणी प्रश्न मार्गी लावणे अपेक्षित असताना हे दोन्ही उपमुख्यमंत्री फोनवरून सूचना देत आहे हे म्हणजे उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बलाढ्य भारतापुढे पाकिस्तान दुबळाच...

भारताने पाकिस्तानवर आणि काश्मिरमधे ७ मेच्या पहाटे लष्करी कारवाई केली. या लष्करी कारवाईला भारताने 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव दिलं आहे. भारताचं असं म्हणणं आहे की हे हल्ले 'दहशतवादी ठिकाणांवर केले आहेत.'

भारतानं यावेळी पाकिस्तानात घुसून हल्ला करण्याऐवजी आपल्याच क्षेत्रातून क्षेपणास्त्र सोडली आहेत. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, यावेळी भारताने पाकिस्तानची मुख्य भूमी पंजाबमधून हल्ला केला आहे. जो हल्ला पाकिस्तानच्या जिव्हारी लागला असल्याचे दिसत आहे. भारताच्या या सिंदूर ऑपरेशनवर पाकिस्तानने वेगवेगळे दावे केले आहेत. मात्र ते सगळे फोल ठरत आहेत. पण देशवासीयांना ज्याची प्रतीक्षा होती ती आज पूर्ण झाल्याच्या भावना संपूर्ण देशभरातून उमटत आहेत. दुसरीकडे भारताची ही सुरुवात असून, याहीपेक्षा कठोर हल्ले भारताकडून केले जातील असे सांगितले जात आहे. यासाठी भारताची रणनीती ठरली आहे. मात्र या दोन देशांच्या ताकतीची तुलना आता केली जाऊ लागली आहे. अशी तुला यापूर्वीही केली गेली आहे. आणि आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा तुलना केली जात आहे.

भारताजवळ बीएमडी सील्स यांनी बॅलिस्टिक मिसाईल डिफेन्स आहे आणि पाकिस्तानजवळ ती प्रणाली उपलब्ध नाही. पण बीएमडी नेहमी १०० टक्के यशस्वी होत नाही. इस्त्रायलमध्ये आपण ते पाहिलं आहे. त्याचा आर्यन डोम काही वेळा काम करत नव्हता. असं असलं तरीही या क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीनं अनेक मोठे हल्ले थांबवण्यात महत्त्वाची भुमिका बजावली. भारताजवळ धोरणात्मक आणि पारंपरिक अशा दोन्ही पद्धतीची क्षेपणास्त्र आहेत. अग्नी हे धोरणात्मक क्षेपणास्त्र आहे तर ब्राह्मोस पारंपरिक.

''याची तुलना पाकिस्तानच्या गौरी आणि बाबर या क्षेपणास्त्रांशी करता येईल. पण भारताकडच्या क्षेपणास्त्राची हल्ल्याची क्षमता त्यापेक्षा फार जास्त आहे. भारताच्या देखरेख प्रणालीतही आता खूप सुधार झाला आहे.'' दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात राष्ट्रीय सुरक्षा केंद्रातले प्राध्यापक लक्ष्मण कुमार सांगतात, ''आकाश आणि एस-४०० या दोन भारताकडे असलेल्या हवाई संरक्षण प्रणालींचा फार उपयोग होईल. पाकिस्तानजवळ एवढी प्रभावी यंत्रणा उपलब्ध नाही. भारताकडे असलेलं अग्नी- ५ हे क्षेपणास्त्र जमिनीपासून ५ ते ८ हजार किलोमीटर वरपर्यंत मारा करू शकतं. दुसरीकडे पाकिस्तानच्या शाहीन-३ या क्षेपणास्त्राची मारण्याची क्षमता २,७५० किलोमीटर एवढी आहे. शस्त्रांसाठी भारत रशियावर अवलंबून आहे, तर पाकिस्तान चीनवर. पश्चिमेकडील देश अनेक वर्ष भारताला क्षेपणास्त्र तंत्रज्ञान देण्यास टाळाटाळ करत होते. पण फ्रान्स आणि भारत यांनी मिळून क्षेपणास्त्र तंत्रज्ञानावर काम केलं आहे. त्यातच भारताला इंटर कॉन्टिनेंटल बॅलिस्टिक मिसाइल (आयसीबीएम) या क्षेपणास्त्रांचाही समावेश आहे. हे आयसीबीएम क्षेपणास्त्र असलेले जगात फक्त ७ देश आहेत. त्याचबरोबर अँटी बॅलिस्टिक मिसाईल सिस्टिम असणाऱ्या मोजक्या देशांमध्येही भारताचा समावेश होतो, असं संरक्षण विश्लेषक हॅरिसन कास 'द नॅशनल इंटरेस्ट'मध्ये लिहितात. ''भारताकडे क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीअतंर्गत दोन पद्धतीची क्षेपणास्त्र येतात. पहिलं, पृथ्वी हवाई संरक्षण क्षेपणास्त्र (पीएडी). त्याचा वापर उंचावरचे हल्ले थांबवण्यासाठी करता येऊ शकतो. , दुसरी थोडी ॲडव्हान्स हवाई संरक्षण प्रणाली (एएडी). त्याने कमी उंचीवरचे क्षेपणास्त्राचे हल्ले रोखता येऊ शकतात,'' असं हॅरिसन कास सांगतात.

भारताच्या अँटी बॅलेस्टिक मिसाईल सिस्टिम कमीतकमी ५००० किलोमीटर दूरवरून होणारा क्षेपणास्त्र हल्ला थांबवू शकते अशी आशा बाळगता येईल. भारताने रशियासोबत ब्राह्मोस आणि ब्राह्मोस-२ हायपरसोनिक क्रूज ही क्षेपणास्त्रही विकसित केली आहेत. ती जमिनीवर, हवेत, समुद्रात आणि समुद्रावर बांधलेल्या व्यासपीठावरूनही प्रक्षेपित करता येतात. ''भारताकडे पारंपरिक आणि आण्विक शस्त्र असणाऱ्या क्षेपणास्त्रांचे अनेक प्रकार आहेत. यासोबतच, समोरून क्षेपणास्त्र हल्ला झाला तर तो थांबवण्याचीही क्षमता आहे. दुसरीकडे पाकिस्तानकडेही पारंपरिक आणि आण्विक शस्त्र असणाऱ्या क्षेपणास्त्राचे अनेक प्रकार आहेत. दोन्ही देशांनी एकमेकांपासून असणाऱ्या संभाव्य धोक्यांचा विचार करून आपल्या क्षेपणास्त्र क्षमतेचा विकास केला आहे, असं म्हटलं जातं. पण भारतासारखी आयसीबीएम क्षेपणास्त्र प्रणाली पाकिस्तानकडे नाही. पाकिस्तानला त्याची अत्यंत गरज असल्याचं अनेक संरक्षण विश्लेषक सांगतात. यापूर्वी चीन आणि भारतात युद्ध झालेलं आहे. भारत स्वतःच्या संरक्षण क्षमतेची बांधणी त्यादृष्टीनेच करत आहेत. दुसरीकडे पाकिस्तान अजूनही फक्त भारतालाच आपला शत्रू मानतो. भारतातले प्रसिद्ध संरक्षण विश्लेषक राहुल बेदी सांगतात की, आयसीबीएम वापरायची वेळ आली तर सगळं उद्ध्वस्त होईल. ''आयसीबीएमचा आकाशातला वेळ १५ ते २० सेकंद एवढाच आहे. आयसीबीएम हे एक धोरणात्मक शस्त्र आहे. चीनचा विचार करता भारताने ते बनवलं होतं. पाकिस्तानकडे आयसीबीएम उपलब्ध नाही. पाकिस्तानला त्याची गरजही नाही. पाकिस्तानने भारताकडे पाहात त्यांची लष्करी तयारी केली आहे. तर, भारताने चीनचं आव्हान समोर ठेवून,'' राहुल बेदी सांगतात. १९९८ मध्ये भारताने अणू चाचणी केली तेव्हा अटल बिहारी वाजपेयींनी बिल क्लिंटन यांना लिहिलेल्या पत्रात तसंच म्हटलं होतं. पाकिस्तानने चीनसोबत शाहीन ही क्षेपणास्त्राची मालिका विकसित केली आहे. हे शाहीन क्षेपणास्त्राने लहान, मध्यम अंतरावर आणि दूरवरही हल्ला करता येऊ शकतो. पाकिस्तानकडे एचक्यू-९बीई आहे, पण भारतानं ब्राह्मोसचा वापर केला तर त्याचा बचाव करणं पाकिस्तानला शक्य होणार नाही. म्हणून पाकिस्तानच्या संसदेत ब्राह्मोस सुपरसोनिक क्षेपणास्त्रावरून विरोधी पक्ष चिंता व्यक्त करतात. भारताचं एक क्षेपणास्त्र मे २०२२ मध्ये चुकून पाकिस्तानकडे प्रक्षेपित झालं होतं. तेव्हा पाकिस्तानचे तेव्हाचे राष्ट्रीय संरक्षण सल्लागार मोईद युसूफ यांनी म्हटलं होतं, ''एक सुपरसोनिक प्रोजेक्टाइल ४० हजार फूट उंचीवरून सीमा ओलांडून पाकिस्तानमध्ये पडली. ही मिसाइल आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत व्यावसायिक एअरलाइनच्या मार्गाच्या जवळून गेली होती. पाकिस्तानला भारताने याबद्दल काहीही माहिती दिली नाही, हे अत्यंत गैरजबाबदार आहे. भारताजवळ बीएमडी सील्स यांनी बॅलिस्टिक मिसाईल डिफेन्स आहे आणि पाकिस्तानजवळ ती प्रणाली उपलब्ध नाही. पण बीएमडी नेहमी १०० टक्के यशस्वी होत नाही. इस्त्रायलमध्ये आपण ते पाहिलं आहे. त्याचा आर्यन डोम काही वेळा काम करत नव्हता. असं असलं तरीही या क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीनं अनेक मोठे हल्ले थांबवण्यात महत्त्वाची भुमिका बजावली. भारताजवळ धोरणात्मक आणि पारंपरिक अशा दोन्ही पद्धतीची क्षेपणास्त्र आहेत. अग्नी हे धोरणात्मक क्षेपणास्त्र आहे तर ब्राह्मोस पारंपरिक. याची तुलना पाकिस्तानच्या गौरी आणि बाबर या क्षेपणास्त्रांशी करता येईल. पण भारताकडच्या क्षेपणास्त्राची हल्ल्याची क्षमता त्यापेक्षा फार जास्त आहे. भारताच्या देखरेख प्रणालीतही आता खूप सुधार झाला आहे. आकाश आणि एस-४०० या दोन भारताकडे असलेल्या हवाई संरक्षण प्रणालींचा या युद्धात फार उपयोग होईल. पाकिस्तानजवळ एवढी प्रभावी यंत्रणा उपलब्ध नाही.

# अवकाळी पाऊस, गारपिट व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा-खा.काळे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्ह्यात दिनांक ०५ मे ते ०७ मे २०२५ दरम्यान अवकाळी पावसासह वादळी वारे,गारपीट आणि विजांच्या गडगडाटामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नैसर्गिक आपत्तीमुळे पुढील प्रकारचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.**

शेतीचे नुकसान :- शेतातील उभ्या रब्बी हंगामातील पिकांचे बियाणाचा कांदा, लसूण, उन्हाळी बाजरी, उन्हाळी मक्का, ज्वारी, भाजीपाला, फुलशेती, पानतांडे यांचे अतोनात नुकसान झाले आहे. तसेच फळपिके आंबा, मोसंबी, द्राक्ष, डाळिंब व इतर फळबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके आडवी झाली असून सोंगणीला आलेले पीक वाया गेले आहे. जनावरांच्या चा-याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



जनावरांसाठी उभारलेल्या शेडचे पत्रेही उडून गेले आहेत. घर व व्यावसायिक मालमत्तेचे नुकसान अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांवरील छप्पर व पत्रे उडून गेले आहेत. दुकानांवरील पत्र्यांचे शेड उडून गेल्यामुळे दुकानातील मालसामानाचे नुकसान झाले आहे. तसेच घरातील संसारोपयोगी वस्तूंनाही पावसामुळे हानी पोहोचली आहे. वीजपुरवठा खंडित वादळामुळे विद्युत पोल पडल्याने व विद्युत तारा तुटल्यामुळे अनेक भागात वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. या सर्व प्रकारच्या नुकसानीमुळे शेतकरी व नागरिक प्रचंड अडचणीत सापडले असून त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे, तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याची व नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित नुकसानभरपाई देण्याची गरज आहे. तसेच, वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागामार्फत तातडीची कार्यवाही करण्यात यावी. आपण या गंभीर स्थितीची दखल घेऊन तातडीने योग्य त्या उपाययोजना राबवाल, अशी मागणी करण्यात आली यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे,आ राजेश राठोड, मा. आमदार कैलास गोरंटयाल, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. राजाभाऊ देशमुख, विजयजी चौधरी, काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, पंचायत समितीचे मा.उपसभापती सोपान तिरुखे, गोपाल मोरे, गणेश खरात, दिलीप राठी, राजेश राठोड, ज्ञानदेव इंगोले व इतर शेतकरी उपस्थित होते.

# गुरुकृपा इन्स्टिट्यूट ची यशाची परंपरा कायम

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ अँड सायन्स यांची हिवाळी परीक्षा २०२५ फेब्रुवारी महिन्यात पार पडली यामध्ये दरवर्षीप्रमाणे फिजिओथेरपी चा निकाल लागला आणि यावेळीही गुरुकृपा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी या निकालामध्ये बाजी मारली थर्ड इयर १००%, सेकंड इयर ८०%, तर फर्स्ट इयर ६०% असा निकाल लागला या निकालामध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला थर्ड इयर मध्ये अनुक्रमे गौरव वसंत मोरे (प्रथम), सरस्वती संजय जगताप (द्वितीय) तसेच शामल संजय चव्हाण (तृतीय) यांनी बाजी मारली त्यांच्या पाठीवर कौतुबाबतची थाप देण्यासाठी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबा मिश्रा मॅम तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रशांत चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर यशवंतराजे भोसले सर हे होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजहर सर यांनी केले यावेळी मंचावर गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य अमित बिंदू सर,पूनम कानापूरकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

# देवगाव येथील रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करुन रस्ता पुन्हा करण्यासाठी अमरण उपोषण



सारणी । प्रतिनिधी

केज तालुक्यातील देवगाव येथील राज्यमार्ग देवगाव ते रेणुकामाता मंदिर देवगाव या रस्त्याचे काम मागील महिन्यामध्ये झाले आहे. संबधीत गुतेदाराला वारंवार सांगुन पण त्याने काम चांगले केले नाही त्या कामाला एक महिना झाला नाही , तरी संबंधीत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे उकडले आहे. संबधीत गुत्तेदाराने इस्टीमेंट प्रमाणे काम न करता थातुर मातुन आणि बोगस काम करून शासनाची व आमची गावकऱ्यांची फसवणुक केलेली आहे. त्यामुळे कामाची चौकशी करुन संबधीतावर कायदेशीर कार्यवाही करावी तसेच हा रस्ता आमचे जगृत दैवत रेणुकामाता मंदिराकडे जाणारा आहे या रोडवर लोकांची सारखी ये जा आसते तसेच या रोडलगत गावातील वस्त्या जोडलेलया आसल्यामुळे हा रोड आम्हाला डबल झाला नाही तर आमचे फार नुकसान होणार आहे. परंतू हा रस्ता पाच वर्षे दुरुस्त होणार नाही तरी कामाची चौकशी, क्वॉलिटी कंट्रोल मार्फत करून सदरील एजन्सीला काळ्या यादीमध्ये टाकावे व संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे जर आशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास मुंडेयांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आमची मागणी पुढील दहा दिवसामध्ये मान्य नाही झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मी गावकऱ्यासह आमरण उपोषण करणार आहे.

# वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

## सर्वांच्या कायम ऋणात राहिल-शेषेराव जगताप

**वडवणी। प्रतिनिधी**

**वडवणी नगरीचे कार्यतत्पर व अभ्यासू नगराध्यक्ष शेषेराव बाप्पू जगताप यांचा वाढदिवस काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी कोणताही बडेजाव न करता अतिशय साध्या पध्दतीने मात्र उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संपूर्ण दिवसभर त्यांच्या हितचिंतक, स्नेहीजण, मित्रपरिवार व चाहत्या वर्गाने मोठी गर्दी केली होती. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री तथा आमदार प्रकाश दादा सोळंके, माजी मंत्री तथा आमदार सुरेश आण्णा धस, माजी सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांसह सर्वांनी त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या.**

वडवणी शहराचे दबंग तथा अभ्यासू नगराध्यक्ष म्हणून शेषेराव बाप्पू जगताप यांना ओळखले जाते. शेषेराव जगताप यांना मानणारा मोठा तरुण वर्ग वडवणी शहरासह तालुक्यात पहावयास मिळतो. काल दिनांक ७ मे २०२५ बुधवार रोजी शेषेराव जगताप यांचा वाढदिवस कोणताही मोठा गाजावाजा किंवा बडेजाव न करता अत्यंत साध्या पध्दतीने परंतू मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. वडवणी नगरपंचायत प्रशासन यांसह शहरातील व्यापारी वर्ग, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा सर्व स्तरातील नेतेगण, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तसेच सर्व शासकीय कार्यालयांचे कार्यालय प्रमुख तथा कर्मचारी वृंद यांनी प्रत्यक्ष तसेच भ्रमणध्वनीव्दारे त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या व त्यांचे पुढील आयुष्य हे निरोगी व भरभराटीचे जावो असे मनोकामना व्यक्त केल्या. यात खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश आण्णा धस, माजी आमदार आर.टी.जिजा देशमुख, माजी आमदार केशवदादा आंधळे, ज्येष्ठ नेते धैर्यशील काका सोळंके, युवा नेतृत्व जयसिंग भैय्या सोळंके, छत्रपती कारखान्याचे चेअरमन मोहनदादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, पाटोदा नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, बाजार



समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक बाबा वाघमारे, नगरसेवक नागेश डिगे, गटनेते अस्लम भैय्या कुरेशी, बाजार समितीचे संचालक अभिमान कदम, माजी सरपंच ॲड.विकास मुंडे, माजी सरपंच गंपूशेठ पवार, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, मुख्याधिकारी पोपट निगळ, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, अभियंता रमेश बहिर, नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे, सरपंच बंडू नाईकवाडे, युवा नेते अमरसिंह मस्के पाटील, माजी सरपंच हरी पवार, मानवी हक्क अभियानचे विष्णू मुजमुले, माजी सरपंच भिमराव उजगरे, डॉ.भाऊसाहेब पुर्भे, आण्णा महाराज दुटाळ, डॉ.शंकर वाघ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुरेश भोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुग्रीव मुंडे, रयत क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष संदिप वाव्हळे यांच्यासह, राजकीय, सामाजिक, व्यवसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी शेषेराव जगताप यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या. दरम्यान सर्वांचे आपल्यावर असलेले प्रेम यातून जीवनभर उतराई होणे अशक्य आहे. शेवटच्या श्वासापर्यंत सर्वांच्या ऋणात राहील अशी भावनिक प्रतिक्रिया याप्रसंगी शेषेराव जगताप यांनी व्यक्त केली.

पान १वरून...

### बीडच्या पाणी प्रश्नावर

गिराम यांनी म्हटले आहे पाणी प्रश्न सत्ताधारी हे जिल्हाधिकारी यांना निवेदन देत आहे तर कुणी न पवार मोर्चा काढत आहे कुणी पत्रकावर समाधान मानत आहे सत्ता असतानाही त्यांच्यावर ही वेळ येणे दुर्दैवी असून यावरून हेच सिद्ध होते की हे सरकार गेंड्याची कातडी पांगरलेली आहे पण बीड शहरातील जनतेच्या हे पूर्ण लक्षात आले असून फक्त मतांसाठी पत्रक बाजी करायची ह्या पत्रकार नेत्यांना खरंच बीडच्या पाणीप्रश्नाची तळमळ असती तर नगर विकास मंत्री व पालक मंत्र्यांना बीडला बोलावून प्रशासनास बैठक घेऊन पाणी देण्यास भाग पाडले असते पण पाणी प्रश्नातही त्यांना राजकारण सुचते पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बीड शहरातील जनतेच्या पाणी प्रश्न बाबत प्रामाणिकपणे लढत असून लवकरच हा पाणी प्रश्न सोडवून घेणार असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला आहे.

----------

### बीड शहराच्या संदर्भात आ.क्षीरसागरांनी

प्रशासनाला सूचित केले. यासोबतच नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक रस्ता क्रॉसिंग करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आ.सय्यद सलीम व नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

-------------------

# माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांनी केले नलबे कुटुंबियांचे सांत्वन

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत सुपूर्द

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे या तरुणाचे अंगावर वीज पडून निधन पावल्याची दूर्देवी घटना घडली असून याची माहिती समजताच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ बुधवार रोजी नलबे कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले. तसेच या कुटुंबांच्या चार मुली व एक मुलगा यांच्या इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी घेतली असून तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली. तसेच या कुटुंबांला संपूर्ण शासकीय योजना मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन डॉ.प्रितमताई मुंडे यांनी यावेळी दिले.

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील तरुण शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे वय ३५ वर्ष यांचे ते सोमवारी वादळी वारे व अवकाळी पाऊसात शेतात झाडाखाली थांबलेले असतांना अंगावर वीज पडून जागीच मरण पावल्याची दूर्देवी घटना घडली आहे. यामध्ये त्यांना फक्त एक एकर जमिन असून घरातील कमविता व कर्ता व्यक्ती गेल्याने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून यामध्ये पत्नी, लहान तीन मुली, एक मुलगा हे पोरके झाले आहेत. त्यांना आजमित्तीस सर्वोतोपरी मदत करण्याची आवश्यकता असून याची माहिती कळतांच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी दुपारी वडवणी तालुक्यातील ढोरवाडी या गावी जावून दुःखांकीत नलबे कुटुंबियांची भेट घेवून त्यांची पत्नी, तीन मुली व एक मुलगा व कुटुंबीय यांचे सांत्वन करुन



धीर दिला. व यावेळी या चारही मुलांची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी स्विकारली आहे. तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत यावेळी देण्यात आली. तसेच या कुटुंबाला तात्काळ घरकूल योजना देण्याचे उपस्थित गटविकास अधिकारी यांना सूचित केले. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात यावी असे उपस्थित महसूल विभागाचे तलाठी यांना सांगितले. याच बरोबर या कुटुंबाला सर्व शासकीय योजना मिळवून देण्यासाठी स्वतः पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले व या कुटुंबाला सर्वोतोपरी मदत करणार, उघडच्यावर अजिबात पडून देणार नाही असे सांगितले. यावेळी युवा नेते संजय भाऊ आंधळे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव दादा रेडे, बन्सीभाऊ मुंडे उपनगराध्यक्ष, अंकुश वारे माजी उपनराध्यक्ष, महादेव सावंत भाजपा तालुका उपाध्यक्ष, मयुर भैय्या आंधळे सरपंच, दिनेश नाईकवाडे सरपंच, नाना शिंदे, देविदास चव्हाण, बद्रिनाथ व्हरकटे, कल्याण थोरात, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, मुन्ना फड, मनोज पाटील तालुकाध्यक्ष बीड ग्रामीण यांसह ढोरवाडी येथील ग्रामस्थ, पुरुष, महिला, पत्रकार उपस्थित होते.

प्रितमताईंच्या सूचनेनुसार संजय आंधळेंनी स्विकारले मुलांचे शैक्षणिक पालकत्व..

यावेळी या सांत्वनपर भेटीदरम्यान माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी दिवंगत अभिमान नलबे यांच्या तीन मुली व एक मुलगा अशा चारही मुलांचे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शैक्षणिक पालकत्व स्विकारण्याची जबाबदारी युवा नेते संजय भाऊ आंधळे यांना दिल्यानंतर संजय आंधळे यांनीही तात्काळ त्या चारही मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले असून यामुळे या चिमुकल्यांच्या शिक्षणामध्ये कसलाही खंड न पडता त्यांना आवश्यक त्या सर्व शैक्षणिक गरजा पुरविण्याचे अभीवचन यावेळी संजय आंधळे यांनी दिले.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ०८ मे २०२५



## तेजल साळवेने खेलो इंडिया युथ गेममध्ये पटकावली दोन पदके

जालना । प्रतिनिधी

सातव्या खेलो इंडिया युथ गेम्स भागल्पुर बिहार येथील होत असलेल्या खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये जालन्याची तेजल राजेंद्र साळवे हिने तिरंदाजीच्या कंपाऊंड प्रकारात सर्वाधिक ६९७ गुनाचा वेध घेत रँकिंग राऊंडमध्ये प्रथम स्थान प्राप्त केले होते त्या पाठोपात तेजल ने वैयक्तिक गटामध्ये रौप्य पदक मिळवले तर मिक्स प्रकार मध्ये मानव जाधव सोबत सुवर्ण पदक प्राप्त केले.



महाराष्ट्र पुन्हा एकदा पदक तालिकेमध्ये एक नंबर वर आहे.

तेजल ची मॅच महाराष्ट्राची प्रीतिका तिच्यासोबत अंतिम सामना होता. या सामन्यामध्ये १५० पैकी १४४ /१४६ अशा सामन्यामध्ये ती ठिकाणी गोल्ड मेडल व तेजल रौप्य पदक प्राप्त केले. तसेच तेजल मिक्समध्ये बुलढाण्याचा मानव जाधव सोबत महाराष्ट्राने १५२ गुण प्राप्त केले व तामिळनाडू ने १५१ गुण मिळवले. व महाराष्ट्र ने सुवर्ण पदक प्राप्त केले.

२०२४. ला झालेल्याहाव्या खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये सुद्धा सहभाग नोंदवून वैयक्तिक गटामध्ये रौप्य पदक प्राप्त केले होते.तेजल च्या यशामध्ये महत्त्वाचा वाटा जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी माननीय श्रीकृष्ण पांचाळ सर यांचे फार मोठे योगदान लाभले. त्याचवेळी जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे सर, डी. एस. ओ. परदेशी मॅडम, सिद्धार्थ कदम सर,डॉक्टर आशिष राठोड सर, डॉक्टर प्रितेश भाकड सर, डॉक्टर राजेश कुमार चव्हाण, डॉक्टर वाघ सर आदिनी तेजल चे अभिनंदन केले.

# पालवण चौक पाण्याच्या टाकीवर पंकज धांडेचे शोले स्टाईल आदोलन

बीड । प्रतिनिधी

सरकार बदलले पालकमंत्री बदलले परंतु अद्या बीड शहर पाण्याचा प्रश्न टांगणीलाच आहे. शहरात सर्वत्र नागरिकांचा आक्रोश व्यक्त केला जातोय.

दुष्काळाच्या तीव्र झळा सुरू असतानाच बीड शहराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन ही खराब झाली असल्याने गेल्या ३३ दिवसापासून बीड शहराला पाणी आलेले नाही. त्यामुळे येथील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसापासून पाण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे आंदोलनेही करण्यात आले आहेत. परंतू प्रशासनाला याची जाग आल्याचे दिसून येत नाही. मंगळवारी रात्री ७ ते १२पंकज धांडे, अविनाश कांबळे, अक्षय दळवी यांच्यासह काही युवक पालवन चौक येथील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. अखेर रात्री ११




वाजता टाकीत पाणी पडले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुढाकार घेतल्यानंतर

पाणीपुरवठा इंजिनीयर माने व शिवाजी नगर पोलिसांनी त्यांनी समजूत काढून त्यांचे आंदोलन स्थगित केले.

बीड शहराला गेल्या ३३ दिवसापासून नळाला पाणी आलेले नाही. त्यामुळे शहरभर नागरीकांचे हाल होताना दिसत आहे. तर गेली वीस वर्षापासून वीस दिवसाला पाणी सोडले जाते. लाईट बिल अभावी नागरिकांना पाणी मिळत नाही ही समस्या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडली परंतु अजितदादा पवार यांनी अध्याप यावर तोडगा काढलेला नाही. नाव मोठा आणि लक्ष्मी खोटं या मनीप्रमाणे अजित दादांनी या प्रश्नाकडे डोळे झाक केल्यामुळे बिडकारांचे प्रचंड हाल होत आहेत.

आज पालवन चौक येथील युवकांनी पाण्याच्या टाकीवर चढून युवकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या युवकांचे नागरिकाकडून कौतुक केले जात आहे. सांताग्रस्त नागरिक अशाच प्रकारे पुढे येऊन प्रत्येक वार्डात आंदोलन होऊ शकते. महिला नागरिक प्रशासना समोर आपली व्यथा मांडण्यासाठी मोर्चे काढून आपल्या भावना व्यक्त करू शकतात. बिडकारांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता पालकमंत्री अजित दादा पवार यांनी या प्रश्नाला प्रथम प्राधान्य देऊन तातडीने हा प्रश्न सोडवला पाहिजे व बीडकरांना नियमित पाणीपुरवठा केला पाहिजे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी केले नलबे कुटुंबियांचे सांत्वन

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे या तरुणाचे अंगावर वीज पडून निधन पावल्याची दूर्देवी घटना घडली असून याची माहिती समजताच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ बुधवार रोजी नलबे कुटुंबियांची भेट घेवून सांत्वन केले. तसेच या कुटुंबांच्या चार मुली व एक मुलगा यांच्या इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी घेतली असून तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली. तसेच या कुटुंबांला संपूर्ण शासकीय योजना मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन डॉ.प्रितमताई मुंडे यांनी यावेळी दिले.**

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील तरुण शेतकरी अभिमान पांडुरंग नलबे वय ३५ वर्ष यांचे ते सोमवारी वादळी वारे व अवकाळी पाऊसात शेतात झाडाखाली थांबलेले असतांना अंगावर वीज पडून जागीच मरण पावल्याची दूर्दैवी घटना घडली आहे. यामध्ये त्यांना फक्त एक एकर जमिन असून घरातील कमविता व कर्ता व्यक्ती गेल्याने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून यामध्ये पत्नी, लहान तीन मुली, एक मुलगा हे पोरके झाले आहेत. त्यांना आजमित्तीस सर्वोतोपरी मदत करण्याची आवश्यकता असून याची माहिती कळतांच बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी दुपारी



### प्रितमताईंच्या सूचनेनुसार संजय आंधळेंनी स्विकारले मुलांचे शैक्षणिक पालकत्व

यावेळी या सांत्वनपर भेटीदरम्यान माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी दिवंगत अभिमान नलबे यांच्या तीन मुली व एक मुलगा अशा चारही मुलांचे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शैक्षणिक पालकत्व स्विकारण्याची जबाबदारी युवा नेते संजय भाऊ आंधळे यांना दिल्यानंतर संजय आंधळे यांनीही तात्काळ त्या चारही मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले असून यामुळे या चिमुकल्यांच्या शिक्षणामध्ये कसलाही खंड न पडता त्यांना आवश्यक त्या सर्व शैक्षणिक गरजा पुरविण्याचे अभीवचन यावेळी संजय आंधळे यांनी दिले.

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी या गावी जावून दुःखांकीत नलबे कुटुंबियांची भेट घेवून त्यांची पत्नी, तीन मुली व एक मुलगा व कुटुंबीय यांचे सांत्वन करुन धीर दिला. व यावेळी या चारही मुलांची संपूर्ण शैक्षणिक खर्चाची जबाबदारी प्रितमताई यांच्या सांगण्यावरुन युवा नेते संजय भाऊ आंधळे यांनी स्विकारली आहे. तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत यावेळी देण्यात आली. तसेच या कुटुंबाला तात्काळ घरकूल योजना देण्याचे उपस्थित गटविकास अधिकारी यांना सूचित केले. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात यावी असे उपस्थित महसूल विभागाचे तलाठी यांना सांगितले. याच बरोबर या कुटुंबाला सर्व शासकीय योजना मिळवून देण्यासाठी स्वतः पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले व या कुटुंबाला सर्वोतोपरी मदत करणार, उघड्यावर अजिबात पडून देणार नाही असे सांगितले. यावेळी युवा नेते संजय भाऊ आंधळे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव दादा रेडे, बन्सीभाऊ मुंडे उपनगराध्यक्ष, अंकुश वारे माजी उपनराध्यक्ष, महादेव सावंत भाजपा तालुका उपाध्यक्ष, मयुर भैय्या आंधळे सरपंच, दिनेश नाईकवाडे सरपंच, नाना शिंदे, देविदास चव्हाण, बद्रिनाथ व्हरकटे, कल्याण थोरात, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, मुन्ना फड, मनोज पाटील तालुकाध्यक्ष बीड ग्रामीण यांसह ढोरवाडी येथील ग्रामस्थ, पुरुष, महिला, पत्रकार उपस्थित होते.

## नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरीचे कार्यतत्पर व अभ्यासू नगराध्यक्ष शेषेराव बाप्पू जगताप यांचा वाढदिवस काल दि.७ मे २०२५ बुधवार रोजी कोणताही बडेजाव न करता अतिशय साध्या पध्दतीने मात्र उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संपूर्ण दिवसभर त्यांच्या हितचिंतक, स्नेहीजण, मित्रपरिवार व चाहत्या वर्गाने मोठी गर्दी केली होती. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री तथा आमदार प्रकाश दादा सोळंके, माजी मंत्री तथा आमदार सुरेश आण्णा धस, माजी सभापती जयसिंग भैय्या सोळंके यांसह सर्वांनी त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या.

वडवणी शहराचे दबंग तथा अभ्यासू नगराध्यक्ष म्हणून शेषेराव बाप्पू जगताप यांना ओळखले जाते. शेषेराव जगताप यांना मानणारा मोठा तरुण वर्ग वडवणी शहरासह तालुक्यात पहावयास मिळतो. काल दिनांक ७ मे २०२५ बुधवार रोजी शेषेराव जगताप यांचा वाढदिवस कोणताही मोठा गाजावाजा किंवा बडेजाव न करता अत्यंत साध्या पध्दतीने परंतू मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात



आला. वडवणी नगरपंचायत प्रशासन यांसह शहरातील व्यापारी वर्ग, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय अशा सर्व स्तरातील नेतेगण, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तसेच सर्व शासकीय कार्यालयांचे कार्यालय प्रमुख तथा कर्मचारी वृंद यांनी प्रत्यक्ष तसेच भ्रमणध्वनीव्दारे त्यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या व त्यांचे पुढील आयुष्य हे निरोगी व भरभराटीचे जावो असे मनोकामना व्यक्त केल्या. यात खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश आण्णा धस, माजी आमदार आर.टी.जिजा देशमुख, माजी आमदार केशवदादा आंधळे, ज्येष्ठ नेते धैर्यशील काका सोळंके, युवा नेतृत्व जयसिंग भैय्या सोळंके, छत्रपती कारखान्याचे चेअरमन मोहनदादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, पाटोदा नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, नगरसेवक बाबा वाघमारे, यांच्यासह, राजकीय, सामाजिक, व्यवसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी शेषेराव जगताप यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या. दरम्यान सर्वांचे आपल्यावर असलेले प्रेम यातून जीवनभर उतराई होणे अशक्य आहे. शेवटच्या श्वासापर्यंत सर्वांच्या ऋणात राहील अशी भावनिक प्रतिक्रिया याप्रसंगी शेषेराव जगताप यांनी व्यक्त केली.

## नदीवर कोणाचाही हक्क नाही काम सुरळीत होणार-विजय चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

नदीवर कोणाचाही हक्क नाही. नदी खोलीकरण, रुंदीकरणाला अडथळा निर्माण होणार नाही व नदी स्वच्छता मोहिमेत कायद्यात रहाल तर फायद्यात रहाल - मा उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी ०७/०५/२०२५ रोजी ताडहदगावं च्या मुसा भद्रायणी नदी चे मा. उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण आणि सरपंच श्रीमती शारदा प्रकाश वाघमारे यांच्या हस्ते नदी खोलीकरणाला सुरुवात झाली.

समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई यांच्या कडून मोफत मिळालेले पोकलेन्ड मध्ये नदीच्या कडेला असलेले शेतकरी आणि गावातील दानशूर ग्रामस्थांच्या वर्गणी तून डिझेल टाकून नदी चे काम करण्यात येत आहे.

अंबड - घनसावंगी रोडवरील पुलाखाली ताडहदगांव मधील ग्रामस्थ परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत नारळ फोडून शुभारंभ करण्यात आले. नदी वर कोणाचाही हक्क नाही. नदी स्वच्छता, खोलीकरण रुंदीकरणाला अडथळा निर्माण होणार नाही काम बंद पडणारं नाही याची काळजीघ्या असा सल्ला श्री विजय चव्हाण यांनी कायदेशीर मार्गदर्शन केले. तसेच ताडहदगावं ग्रामस्थांचे कौतुक करुन अभिनंदन केले.



सरपंच श्रीमती शारदा वाघमारे, श्री कृष्णा वाघुंडे , भीमाशंकर वाघुंडे यांनी पाण्याचे महत्व पटवून सहकार्य करण्याची विनंती केली.

बापूराव हरिश्चंद्र, किशोर दत्तात्रय वाघुंडे, परमेश्वर वाघुंडे, भीमाशंकर वाघुंडे, कृष्णा वाघुंडे, प्रकाश वाघमारे, दत्ता नारायण जामकर, दिगंबर वाघुंडे, चंद्रकांत वाघुंडे, दीपक हरिश्चंद्रे, बंडू टेकाळे, राजाराम खंडागळे, अनिल डवले आणि देवा चित्राल यांची उपस्थिती होती.

# कला व कलाकार ही तर समाजाची ऊर्जास्थाने - डॉ.राजेश इंगोले

### ध्वनी,चित्र, रंजन या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे अंबाजोगाईकरांना घडले लोककलेचे दर्शन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**कला व कलाकार ही त्या त्या देशाची, समाजाची ऊर्जास्थाने असतात. ज्यामुळे लोकांमध्ये प्रबोधन आणि क्रांतीचे विचार रूजविले जातात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले. लोकनेते विलासराव देशमुख सभागृहात झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय व सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित वेव्ह २०२५ या कार्यक्रमांतर्गत आयोजित संगीत सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.**

यावेळी विचारमंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हणून अंबाजोगाईचे नायब तहसीलदार मिलिंद गायकवाड यांच्यासह तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, अभय जोशी व भीमाशंकर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते कलादेवतेचे प्रतिमापूजन व दीप प्रज्वलाने करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, भारत सरकार द्वारा आयोजित हा उपक्रम महाराष्ट्रामध्ये महायुती सरकार द्वारे प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. व महाराष्ट्रातील लोककलाकारांना एक सशक्त व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव




शिंदे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे अभिनंदन केले. कलेचा वारसा हा ऐतिहासिक असतो आणि विविध कलाकार इतिहासामध्ये आपली नोंद कलेच्या माध्यमातून करतात आणि आजरा अमर होतात. कला ही त्या कलाकाराला माणूस म्हणून समृद्ध करत असते आणि त्यामुळे कलाकार हे आपल्या आयुष्यात सदैव समाधानी, सुखी आणि आनंदी असतात असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त करत असे सांस्कृतिक कार्यक्रम महाराष्ट्र सरकार तर्फे वारंवार अंबाजोगाई मध्ये घेण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना मिलिंद गायकवाड यांनी शासन हे महाराष्ट्रातील कला व कलाकार यांना जागतिक पातळीवर घेऊन जात आहे असे मत व्यक्त केले. यानंतर झालेल्या चर्चासत्रात निषाद म्युझिक कंपनीचे प्रकाश बोरगावकर यांनी संगीत ही मोठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ झालेली आहे आणि भारताकडे यासाठी लागणारी सर्व संसाधने आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय संगीताचा धबधबा आज ही कायम आहे. येथील तरूणांनी ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या जीवनाचे करिअर संगीत क्षेत्रात घडविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरूवात प्रख्यात शाहीर तुकाराम सुवर्णकार यांच्या जय जय महाराष्ट्र माझा या गाण्याने झाली. यावेळी २०२५ ची ध्वनिचित्रफीत सगळ्यांना दाखवून यावर चर्चासत्र संपन्न झाले. या कार्यक्रमात पोवाडा जागरण गोंधळ लोकगीते स्थानिक कलाकारांची चर्मवाद्यांवर जुगलबंदी महाराष्ट्र गीत स्थानिक लोककला लोकधारा शाहिरी गीते जनप्रबोधनपर गीते यांचे प्रभावी सादरीकरण झाले. यावेळी अनेक कलाकारांनी आपल्या गायन नृत्य गोंधळी कला यांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक समन्वयक प्रवीण जोगदंड यांनी तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.अनंत कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगेश म्हेत्रजकर, राजकुमार गायके, महेश वेदपाठक, आकाश चौरे, मंगेश भिसे, डॉ.प्रवीण केदार यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### खरीप हंगामासाठी,दर्जेदार बियाणे

परंतु एकाच कंपनीचे बियाणे कृषी विक्रेत्यांच्याकडून वारंवार शेतकऱ्यांना दिले जाते त्यामुळे कापूस व तूर या पिकाची दरवर्षी मिळणारे सरासरी यामध्ये तफावत येत आहे .त्यामुळे कृषी विक्रेत्यांना विनंती आहे की वेगवेगळ्या प्रजातीच्या बियाणांची आपण शेतकऱ्यांना माहिती देऊन ते लागवड करण्यासाठी व पेरणीसाठी प्रोत्साहित करावे.. आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर खते व बियाणांचे लिंकिंग स्वरूपात विक्री सुरू आहे उदाहरणार्थ ज्या शेतकऱ्यांना युरिया घ्यायचा आहे त्या शेतकऱ्यांना नॅनो युरियाची बॅग घेणेबाबत सक्ती होत आहे. एका खताच्या कंपनीबरोबर दुसऱ्या कंपनीचे खत घेणे बंधनकारक केले जात आहे ही बाब गंभीर आहे.त्यामुळे सर्व कृषी सेवा केंद्र यांना विनंती आहे की शेतकऱ्यांची अडवणूक करू नका. यासह खरीप हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या बाबतीत पडणारी कीटकनाशके रोगराई व त्याबाबत फवारणी करण्यासंदर्भातील बायो ऑरगॅनिक औषधे याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जावा रासायनिक औषधांचा व केमिकल युक्त औषध व फवारणी साठी लागणाऱ्या पावडर ह्या कमी प्रमाणात वापरल्या जाव्यात.. यासाठी कृषी विभाग व त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना जागृत करणे आवश्यक असल्याचे सांगितले.यावेळी बियाणे उगवणक्षमता व बीजप्रक्रिया याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. शेतीमधील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी घरचं बियाणे उगवण क्षमता तपासून पेरणीसाठी वापरावे तसेच बियाण्याला रासायनिक किंवा जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके व जैविक घटकांची बीजप्रक्रिया केल्याने उगवण क्षमता चांगली होते तसेच रोपावस्थेतील कीड व रोगांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी असे आवाहन मा. आ. सुरेश धस यांनी शेवटी केले.

### पारदर्शक आणि स्वच्छ कारभार

महिला सरपंच असल्याने बदनामी करत आहेत. समोरासमोर बसून विकास कामे, आलेला निधी, खर्च झालेला निधी आम्ही गावाला दाखवू, पण अशी बदनामी करण्याचा प्रयत्न करू नये, स्वच्छ व पारदर्शक कारभार ग्रामपंचायतीचा असल्याचे सरपंच आशा आण्णासाहेब शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### परळीत कर्कश आवाज

जाळ्यात सापडले पोलिसांनी पोलीस अचानक अवतरल्याने वाहन चालक अलगद पोलिसांच्या जाळ्यात सापडले सहातील नागरिकांना अनेक वर्षापासुन दिवसांनी अडवणे चौकशी करणे याची सवय नसल्याने अनेक वाहनचालकानी निमूदपणे दंड देत आपली सुटका करून घेतली या विशेष कारवाईदरम्यान पोलिसांनी जवळपास १२७ वाहनावर कारवाई केली यात फॅन्सी नंबर विना कागदपत्रे दादा भाऊ अण्णा अशा फॅन्सी नंबर वाहनावर व नो पार्किंग झोन मधील वाहानावर कार्यवाही केली या मोहिमेत वाहन चालकावर ७२ हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली असून या कारवाईमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे सुसाट वाहन चालकांना चाप बसण्यासाठी अशा कारवाईक करण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.या कारवाईत बीड वाहतूक पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ पोहे अजिनाथ बांगर त्रिंबक कुडके बाळासाहेब नागरगोजे राम पवार पोना सचिन सारणिकर अजिनथ मुंडे परळी पोस्टचे पोहे सुर्यकांत मोरे चालक मदने असे सहभागी होते.

### जायकवाडी प्रकल्प उजव्या

काम मार्च २०२४ पासुन सुरू करण्यात आले असुन सद्यस्थितीत १३२ कि.मी.पैकी १०५ कि.मी. (८०%) काम पूर्ण करण्यात आलेले आहे.यामुळे पाणी वहन क्षमता ९०० क्युसेस वरून २२०० क्युसेस झाली आहे.तसेच पाण्याची गळती व अपव्यय कमी झाल्यामुळे उजव्या कालव्याद्वारे सिंचन पाणी पाळी २० ते २२ दिवस चालवावी लागत होती. यातील कमी होवुन १४ ते १५ दिवसात पूर्ण होत आहे. भविष्यात पावसाळ्या मध्ये माजलगाव धरण पूर्ण क्षमतेने भरून अधिकची सिंचन व्यवस्था निर्माण होणार आहे.

### शहरवासियांना चार

त्रास होईल अशा ठिकाणी टाकु नये. यासर्व शहरवासीयांच्या महत्वाच्या प्रश्नांवर आज काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर पालिकेचे मुख्याधिकरी अंधारे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील, ओबीसीचे नेते गणेश राउत, ओबीसी जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव, इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, मनावधिकरचे जिल्हाध्यक्ष शेख रियाज, बीड तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष शेख कादर बाबा इनामदार, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हनुमान घोडके, अल्पसंख्यांकचे तालुकाध्यक्ष शेख बबलु भाई, शेख नजीर, अशोक जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### संत बंकटस्वामी महाराज यांनी

पांडुरंगाच्या समोर केलेली शतकोटी तुझे करीन कवित्व ही प्रार्थना आणि त्यानंतर नामदेव महाराजांचा अवतार असलेल्या तुकाराम महाराजांनी अभंग गाथा लिहिला या गाथेतील पहिलाच अभंग हा मंगल करणारा आहे. कोणतेही काम करायच असेल तर मंगल करावे लागते. आज बंकट स्वामींच्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात होत असल्याने हा वस्तू निर्देशनात्मक मंगल करणारा अभंग यावर चिंतन मांडले.पुढे बोलताना कलियुगातील माणसांना आयुष्य शंभर वर्षाचे आहे या अगोदरच्या प्रत्येक युगामध्ये मोठ्या प्रमाणात आयुष्य होते, यामुळे इतर साधना करता येत होत्या मात्र कलियुगामध्ये अल्प आयुष्य मानव देह असल्याने काही बंधन येतात. म्हणून साधन कोणते. नाम हे मंगलस्वरूप आहे. तर वारकरी संप्रदाय हा सगुण आणि निर्गुण यामध्ये भेद मानत नाही दोन्ही एकच आहे अशी वारकऱ्यांची धारण आहे. देवाची भक्ती करत असताना सगुन आणि निर्गुण भक्ती करता येते असेही महाराज म्हणाले.. भगवान परमात्म्याचे चरण सम आहेत तो विटेवर उभा साजरा आहे. त्याच्या चरणाजवळ माझी वृत्ती रहावी अशी प्रार्थना तुकाराम महाराज करतात आणि संसारातील इतर माईक पदार्था ज्याच्यामुळे दुःख पदरात पडते ते नको.. संत बंकट स्वामी महाराज यांच्या दरबारात आज पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्त लाखो भाविक येतात आणि अध्यात्मिक शक्ती घेऊन पुनित होतात असेही महादेव महाराज म्हणाले. तसेच प्रदीप मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेला सर्वांनी यावे असे आवाहनही महादेव महाराजांनी केले.या कीर्तनाला साथ संगत . गायनाचार्य गोविंद महाराज नाईकवाडे, श्री ह भ प बाबासाहेब महाराज कदम, श्री ह भ प वसंत महाराज शिंदे श्री ह भ प कृष्णा महाराज आंधळे, श्री ह भ प महादेव महाराज रोडे, मृदुंग साथ श्री ह भ प अनिकेत महाराज लांडे, श्री ह भ प प्रवीण महाराज, यांच्यासह बंकट स्वामी महाराज वारकरी शिक्षण संस्थेतील शेकडो टाळकरी विद्यार्थी मंडळी उपस्थित होती.

cmyk

# हरभरा, मसूरचा भाव हमीभावापेक्षा कमी गव्हाला दोन महिन्यापासून अधिक दर

खरिपातील पिकांना हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यानंतर रब्बी पिकांनाही कमी दर मिळत आहे. रब्बीतील हरभरा, मसूर आणि मोहरी पिकांना हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. तर गव्हाचे भाव हमीभावापेक्षा काहीसे अधिक आहे. महत्वाच्या पिकांचे भाव कमी असल्याने शेतकऱ्यांना फटका बसत आहे.

खरिपातील महत्वाच्या कापूस आणि सोयाबीन पिकांना यंदा हमीभावापेक्षा कमी दर मिळाला. सोयाबीनचे भाव तर उत्पादन खर्चापेक्षाही कमी आहेत. त्यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत. शेतकऱ्यांना रब्बीच्या पिकांकडून अपेक्षा होती. २०२४ मध्ये पावसाळा चांगला झाल्याने उत्पादनही गेल्यावर्षीपेक्षा चांगले आले. मात्र तरीही रब्बी पिकांकडून शेतकऱ्यांची निराशा होत आहे. उत्पादन चांगले येऊनही बाजारभाव नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. केंद्र सरकारने यंदा गव्हासाठी



२ हजार ४२५ रुपये हमीभाव जाहीर केला. मात्र मार्च आणि एप्रिल महिन्यात गव्हाचे भाव हमीभावापेक्षा जास्त होते. मार्च महिन्यात गव्हाचे सरासरी भाव २ हजार ६०० रुपयांच्या दरम्यान होते. तर एप्रिल महिन्यात आवक वाढल्याने दर काहीसे कमी झाले. एप्रिल महिन्यात गव्हाचा सरासरी भाव २ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान होता. देशात यंदा गव्हाची लागवड वाढली होती. त्यामुळे सुरुवातीपासून उत्पादन वाढीची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे गव्हाचे भावही कमी होत होते. मात्र, गव्हाची काढणी सुरु झाल्यानंतर उत्पादकता स्पष्ट झाली. उत्पादनात मोठी वाढ नसल्याचे लक्षात आल्यानंतर गव्हाच्या दरात पुन्हा काहीशी वाढ झाली होती. त्यामुळे मार्च आणि एप्रिल महिन्यात गव्हाचे भाव हमीभावापेक्षा कमी होते. यापुढे गव्हाचे भाव सरकारची खरेदी आणि विक्री यावर अवलंबून राहणार आहे. सरकारची खरेदी ३१० लाख टनांपेक्षा जास्त झाल्यास याचा दरावर दबाव राहील.

**हरभऱ्याचे भाव कमी**

चालू हंगामात हरभऱ्याचे भाव हमीभावापेक्षा कमी आहेत. सरकारने यंदा हरभऱ्याला ५ हजार ६५० रुपये हमीभावा जाहीर केला. मात्र सध्या हरभऱ्याला सरासरी ५ हजार ५०० रुपयांचा भाव मिळत आहे. हरभरा बाजारावर वाढत्या आयातीचा दबाव आहे. सरकारला यंदा हमीभावाने खूपच कमी हरभरा मिळत आहे. त्यामुळे भविष्यात किमती नियंत्रणात आणण्यासाठी सरकार आयात वाढवत आहे.

**मसूरचे भावही कमीच**

देशात यंदा मसूरचे उत्पादन सरासरी राहण्याचा अंदाज आहे. मात्र वाढत्या मसूर आयातीचा दरावर दबाव दिसून येत आहे. गेल्या वर्षभरात मसूरची विक्रमी आयात झाली. याचा दबाव दरावर आला. सरकारने यंदा मसूरला ६ हजार ७०० रुपये हमीभाव जाहीर केला. तर बाजारात सध्या ६ हजार १२७ रुपयांचा दर मिळत आहे. तसेच मोहरीला यंदा ५ हजार ९५० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. तर बाजारात सध्या मोहरीला ५ हजार ७०० रुपयांचा भाव मिळत आहे.

## बासमती तांदळाच्या किंमतीत वाढ; भारत-पाकच्या तणावाचा परिणाम

**भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे बासमती तांदळाच्या किंमतीत वाढ झाली आहे. भारत आणि पाकिस्तान बासमती तांदळाचे प्रमुख उत्पादक देश आहेत. दोन्ही देशातील सुगंधी बासमतीला जागतिक बाजारात मागणी असते. परंतु पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर मात्र दोन्ही देशातील संबंधात तणाव वाढला आहे.**


त्यामुळे मागील सहा महिन्यात सतत घसरण होत असलेल्या बासमती तांदळाच्या किंमतीत मागील दोन आठवड्यात १० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. जागतिक बाजारातील खरेदीदारांनी भारताकडे खरेदीसाठी मोर्चा वळवला असल्याचं निर्यातदारांनी सांगितलं आहे. देशांतर्गत बाजारात तांदळाच्या पुरवठ्या अभावी किंमती वाढू नयेत, यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत होते. त्यामुळे केंद्र सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये बासमतीवर किमान निर्यात शुल्क आकारलं. परिणामी तांदळाच्या किंमतीत घसरण झाली. त्यानंतर केंद्र सरकारने किमान निर्यात शुल्क हटवले. परंतु बासमतीची निर्यात मंदावली. तर दुसरीकडे जागतिक बाजारात भारताची प्रतिमा बेभरवशाचा निर्यातदार देश अशी झाल्याने मध्यपूर्वेतील देशांनी तांदूळ खरेदीसाठी पाकिस्तानकडे मोर्चा वळवला. त्यामुळे देशांतर्गत तांदळाच्या किंमतीत मोठी घसरण झाली होती. या दोन्ही कारणांमुळे भारतातील भात उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. सध्या मात्र भारत-पाकमधील तणावाच्या स्थितीमुळं तांदळाचा पुरवठा कमी होईल, अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे खरेदीसाठी मध्यपूर्वेतील देशांसह अमेरिकनेही भारतीय तांदळाची खरेदी वाढवली आहे. त्यामुळे तांदळाची किंमतीत वाढ झाल्याचं निर्यातदार सांगत आहेत. भारतात उकडा बासमती १५०९ सर्वाधिक वापरला जातो. ग्राहकांची या वाणाला पसंती असते. मागील दोन आठवड्यात बासमती १५०९ ची किंमत ५३ रुपये प्रतिकिलोवरून ५९ रुपयांवर पोहचली आहे. तर स्टिम्ड बासमती तांदळाची किंमत ६२ रुपये प्रतिकिलोवरून ६९ रुपयांवर पोहचली आहे. तसेच किरकोळ बाजारात सेल्ला तांदळाची किंमत प्रतिकिलो ७५ रुपये आणि उच्च प्रतिच्या बिर्याणी तांदळाची किंमत ८० रुपये प्रतिकिलो झाली आहे. मध्यपूर्वेतील खरेदीदार सौदी अरेबिया, इराण, येमन आदी देशांनी भारताकडून बासमती तांदळाची खरेदी सुरू केली आहे. तसेच अमेरिकन खरेदीदारही टॅरिफ लागू होण्यापूर्वी तांदळाचा साठा उचलण्यासाठी खरेदी करत आहे. अमेरिकन खरेदीदार दरवर्षी ३ लाख टनांहून अधिकच्या बासमती तांदळाची खरेदी भारतातून करतात. अमेरिकेला तांदूळ पोहचण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे भारताकडून बासमती तांदळाच्या खरेदीवर अमेरिकन खरेदीदार भर देत आहेत. दरम्यान, भारत जगाला ७० टक्के तांदूळ निर्यात करतो. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचं निर्यातदार सांगत आहेत.अर्थव्यवस्थेसह व्यापार आणि देशांतर्गत पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे शांतता आणि स्थिरता अन्नधान्याची किंमती स्थिर ठेवण्यासाठी महत्त्वाची असल्याचं जाणकार सांगतात.

## ॲबसिसिक ॲसिडला रोखत नायट्रेट देते अंकुरणाच्या प्रक्रियेला चालना

**बियांच्या अंकुरणाची प्रक्रिया रोखणाऱ्या संप्रेरकाचे काम काही प्रमाणात थांबवून अंकुरणाला चालना देण्याचे काम नायट्रेट कशा प्रकारे करते, या शोध चायनीज शास्त्र ॲकेडमीच्या क्षीशुआंगबन्ना ट्रॉपिकल बॉटॅनिकल गार्डन, चीन शास्त्र आणि तंत्रज्ञान विद्यापीठ आणि हुनान विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी घेतला आहे. त्यामुळे ॲबसिसिक ॲसिड आणि नायट्रेट यांच्या कार्यामध्ये असलेला हा विरुद्धधर्मी संबंध स्पष्ट झाला आहे. हे संशोधन द प्लांट सेल या संशोधनपत्रिकेमध्ये नुकतेच प्रकाशित झाले आहे.**

वनस्पतीमध्ये वातावरणातील घटकांना प्रतिसाद देणारे संप्रेरक म्हणून ॲबसिसिक ॲसिड ()ओळखले जाते. ते योग्य वातावरण येईपर्यंत बियांच्या अंकुरणाला रोखून धरते. बियांमध्ये अंकुरणाच्या प्रक्रियेला रोखण्याच्या प्रक्रियेमध्ये हे संप्रेरक मध्यवर्ती भूमिका निभावते. मात्र ते नेमके कसे काम करते, याविषयी आजवर फारशी माहिती उपलब्ध नव्हती.

मात्र चायनीज शास्त्र ॲकेडमीच्या क्षीशुआंगबन्ना ट्रॉपिकल बॉटॅनिकल गार्डन, चीन शास्त्र आणि तंत्रज्ञान विद्यापीठ आणि हुनान विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी या संप्रेरकाच्या विरुद्ध भूमिका बजावून अंकुरणाच्या प्रक्रियेला चालना देणाऱ्या नायट्रेटमुळे वनस्पतीच्या अंतर्गत कोणते बदल घडतात, यांचा शोध घेतला आहे. या संशोधनामुळे ॲबसिसिक ॲसिड आणि नायट्रेट यांच्या कार्यामध्ये असलेला हा विरुद्धधर्मी संबंध स्पष्ट झाला आहे. नायट्रेटमुळे बिया अंकुरणाला चालना मिळण्याच्या प्रक्रियेमागील यंत्रणेचा शोध घेताना शास्त्रज्ञांना निन लाइक प्रोटीन ८ (- ८ - ८) आढळले. ते जनुकांच्या कार्यान्वयनाला चालना देते. या प्रयोगामध्ये त्यांनी वेगवेगळ्या मात्रेमध्ये नायट्रेटचे प्रमाण असलेल्या स्थितीमध्ये अर्बिडॉप्सिस वनस्पतीच्या बिया ठेवून, त्यात अंकुरणाची प्रक्रिया



होत असताना त्यातील जनुके कशी प्रतिक्रिया देतात, यांचे विश्लेषण केले गेले. त्यात नायट्रेटच्या मात्रेसोबतच विविध प्रक्रियांचा बियांच्या अंकुरणाच्या दरावर आणि वेळेवर होणारा परिणाम तपासण्यात आला. त्यासाठी बियांना पोटॅशिअम नायट्रेट आणि ॲबसिसिक ॲसिड हे घटक बाहेरून पुरविण्यात आले. सामान्यतः ॲबसिसिक ॲसिडमुळे रोखली जाणारी अंकुरणाची प्रक्रिया नायट्रेटमुळे काही प्रमाणात तरी वाढविल्याचे समोर आहे. या प्रक्रियेमध्ये नायट्रेटने ८ या प्रथिनांना कार्यान्वित केले, तर ॲबसिसिक ॲसिड रोखण्याच्या यंत्रणेमधील ३ आणि ५ हे घटक कार्यान्वित होत होते. नायट्रोजन संयुगामुळे चे परिणाम काही प्रमाणात कमी झाल्यामुळे च्या पातळीमध्ये काही बदल न करताही अंकुरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. नायट्रीक ऑक्साइडच्या यंत्रणेला अकार्यक्षम केलेल्या म्युटंट बियाण्यांमध्ये ८ ची अतिकार्यक्षमता ही एबीए याच्या अतिसंवेदनशीलतेला दाबून ठेवण्यात असल्याचे दिसून आले. त्यामुळे ताणाच्या स्थितीमध्ये बियांचा जोम वाढविण्यासाठी संभाव्य पद्धती विकसित करणे शक्य होणार आहे. आमच्या अभ्यासामध्ये ८ - ३/५ हे मोड्यूल मूलद्रव्यीय तरफेसारखे पर्यावरणातील अन्नद्रव्याच्या उपलब्धतेच्या संतुलनाचे काम करते. यामुळे अन्नद्रव्यांच्या कमतरतेसह ताणांच्या पर्यावरणामध्ये पिकांच्या वाढीसाठी योग्य ती धोरणे विकसित करणे शक्य होणार आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६३ : आंतरराष्ट्रीय मानवतावादी चळवळ म्हणजेच आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस चळवळीची स्थापना करण्यात आली.

१८८६ : डॉ.जॉन स्टाइथ पेम्बरटनने कोका कोला प्रथमतः तयार केले.

१८९९ : क्रांतिकारक वासुदेव चाफेकर यांना फाशी.

१९१२ : पॅरामाउंट पिक्चर्स या कंपनीची स्थापना झाली.

१९३२ : पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य पं. विनायकराव पटवर्धन यांनी पुणे येथे गांधर्व महाविद्यालय सुरू केले.

१९३३ : महात्मा गांधींचे २१-दिवसांचे उपोषण चालू.

१९४५ : दुसरे महायुद्ध युरोप विजय दिन जर्मनीची दोस्त राष्ट्रांसमोर बिनशर्त शरणागती, युरोपमधील युद्ध समाप्त.

१९५४ : केंद्र सरकारने चंद्रनगरला पश्चिम बंगाल प्रांतात समाविष्ट केले.

१९६२ : पश्चिम बंगाल येथील कोलकाता येथे रवींद्र भारती विद्यापिठाची स्थापना.

१९७४ : रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. सरकारविरुद्धचा असंतोष वाढत जाऊन आणीबाणी पुकारली जाण्याला जी कारणे घडली, त्यात हा संप महत्त्वाचा मानला जातो.

१९९४ : ब्रिटन व फ्रान्सला जोडणार्या इंग्लिश खाडीच्या खालून खोदलेल्या युरो टनेल या बोगद्याचे उदघाटन

२००४ : प्रसिद्ध श्रीलंकन क्रिकेटपटू गोलंदाज मुथैया मुरलीधरन यांनी ५२१ खेळाडू बाद करण्याचा विश्वविक्रम आपल्या नावे केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : रेड क्रॉस या संस्थेचे सहसंस्थापक हेनरी डूनेंट यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९१०)

१९०६ : भारताचे माजी भूसेनाप्रमुख प्राणनाथ थापर यांचा जन्म.

१९१६ : स्वामी चिन्मयानंद यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९९३)

१९१६ : भारतीय सिनेमॅटोग्राफर रामानंद सेनगुप्ता यांचा जन्म.

१९२६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार तपन राय चौधरी यांचा जन्मदिन.

१९२९ : भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण तसचं हिंदुस्थानी संगीत क्षेत्रांत दिला जाणारा संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित बनारस घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका गिरीजा देवी यांचा जन्मदिन. त्यांनी गायिलेला ठुमरी हा शास्त्रीय संगीत प्रकारासाठी त्या विशेष ओळखल्या जातात.

१९७० : ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू मायकेल बेव्हन यांचा जन्म.

१९८९ : भारतीय बेसबॉलपटू दिनेश पटेल यांचा जन्म.

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर ह्याचा जन्मदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२० : पाली भाषा व बौद्ध साहित्य या विषयावरचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन.

१९१५ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यसेनानी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राजकीय नेता अमीरचंद बोंबवाल यांचे निधन.

१९२० : भारतीय प्राचीन कालीन भाषा पाली व बौध्द साहित्याचे अभ्यासक चिंतामण वैजनाथ राजवाडे यांचे निधन

१९७२ : भारत रत्न पुरस्कृत पांडुरंग वामन काणे यांचे निधन. (जन्म: ७ मे १८८०)

१९८१ : संस्कृतज्ञ, मराठी कवी डॉ. केशव नारायण वाटवे यांचे निधन.

१९८२ : अनिल उर्फ कवि अनिल (आत्माराम रावजी देशपांडे), मराठी कवी.

१९९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व मार्क्सवादी तत्त्ववेत्ता देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांचे निधन.

१९९५ : पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दीप्रेम भाटिया यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९११)

१९९५ : देवदेवतांची आणि संतांची चित्रे यामुळे प्रसिद्ध असलेले चित्रकार जि. भी. दीक्षित यांचे निधन.

१९९९ : कलादिग्दर्शक श्रीकृष्ण समेळ यांचे निधन.

२००३ : संस्कृत व प्राकृत विद्वान डॉ. अमृत माधव घाटगे यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९१३)

२०१३ : धृपद गायक झिया फरिदुद्दीन डागर यांचे निधन. (जन्म: १५ जून १९३२)

## उन्हाळ्यात जनावरांची प्रजनन क्षमता कमी होण्याची कारणे आणि उपाय

वातावरणातील बदलाचा जनावरांच्या उत्पादनावर परिणाम होतो आणि सर्वात जास्त परिणाम हा प्रजननावर होतो. उन्हाळ्यात जनावरे गाभण राहण्याचे प्रमाण कमी असते. याची कारणे, परिणाम आणि उपाययोजना याची माहिती असल्यास या समस्येवर मात करता येईल.

गाभण न राहण्याची कारणे : चारा आणि पाण्याचा प्रभाव - उन्हाळ्यात जनावरे कमी चारा आणि जास्त पाणी पितात. त्यामुळे रवंथ क्रिया कमी होऊन अपचन होते आणि आम्लाचे प्रमाण वाढते.

योग्य व संतुलित आहार न मिळाल्याने -: जनावरांच्या गर्भाशयाचे मुख माजाच्या काळात व विल्यानंतर उघडे असते. या काळात जनावरांचा गोठा घाण असेल तर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. हा जंतूसंसर्ग घाणीतून योनीमार्गाने गर्भाशयात जाऊन गर्भाशयाचा दाह होतो. योग्य व संतुलित आहार न मिळाल्याने खनिजे व जीवनसत्त्वांच्या व काही विशिष्ट संप्रेरकाच्या कमतरता निर्माण होतात. उन्हाळ्यात उपलब्ध होणारा चारा कमी पौष्टिक आणि प्रथिनयुक्त असतो. याचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होतो. प्रथिनांच्या कमतरतेमुळे जनावरांची वाढ मंदावते, उत्पादन व प्रजनन



क्षमता कमी होते.

क्षारांचे प्रमाण कमी होणे - घामावाटे सोडियम आणि पोटॅशियम यांसारख्या क्षारांचे प्रमाण कमी होते. इतर कारणे - उष्णतेमुळे जनावरांच्या शरीरात ताण निर्माण होतो, ज्यामुळे प्रजनन क्षमता कमी होते. तसेच, उन्हामुळे जनावरांची लैंगिक इच्छा कमी होते.

परिणाम : गाभण न राहणे, गर्भपात, वेतामधील अंतर वाढणे, दुधाचे उत्पादन कमी होणे. उपाययोजना : योग्य निवारा - उन्हापासून जनावरांना बचावासाठी सावलीदार आणि हवेशीर निवारा उपलब्ध करून द्या.

पोषण - उन्हाळ्यात जनावरांना पौष्टिक आणि संतुलित आहार द्या. यामध्ये हिरव्या चाऱ्यासोबतच दाणे आणि खनिज मिश्रण द्या.

शुद्ध पाणी - जनावरांना स्वच्छ आणि थंड पाणी पुरवठा करा.

कृत्रिम रेतन - योग्य वेळी कृत्रिम रेतनद्वारे जनावरांचे प्रजनन करा. पशुवैद्याची मदत - जनावरांमध्ये प्रजननक्षमतेची समस्या असल्यास पशुवैद्याची मदत घ्या.


उलटण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी : जनावरांना दररोज ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्या. उन्हाळ्यात म्हशींचा माज ओळखून वेळीच रेतन करा. सकाळी जनावरांचे निरीक्षण करून माजाची लक्षणे ओळखा. जनावरांना योग्य वेळी फळवा.

उन्हाळ्यात जनावरांची काळजी : जनावरांना योग्य निवारा, पोषण आणि शुद्ध पाणी द्या. हिरवा व सुका चारा खाऊ घाला. प्रथिनयुक्त खुराक किंवा चारा द्या. रेतन सकाळी किंवा संध्याकाळी करा. इतर उपाय : दरवर्षी सांसर्गिक गर्भपाताची चाचणी करून घ्या. विलेल्या जनावराचा वार स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. गर्भाशयाचे गंभीर आजार झालेल्या जनावरांना वेगळे करा. गर्भपात झालेले गर्भ आणि वार गोठ्यापासून दूर टाका. उन्हाळ्यात जनावरांची प्रजनन क्षमता कमी होण्याची अनेक कारणे आहेत. योग्य निवारा, पोषण, पाणीपुरवठा आणि कृत्रिम रेतन यांसारख्या उपाययोजनांद्वारे उन्हाळ्यातही जनावरांची प्रजनन क्षमता वाढवता येऊ शकते.

## एक लिंबू मिळतो १० रुपयाला; लिंबाच्या दरात मोठी वाढ

मे महिनाच्या सुरवातीला राज्यात प्रचंड उकाडा जाणवत असून, दुपारच्या सुमारास घराबाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. ज्यामुळे सध्या बाजारात लिंबाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, सध्या लिंबांच्या दरात वाढ झाली असून, लिंबू प्रतिकिलो २०० ते २५० रुपयांवर पोहोचला आहे. तर एका लिंबासाठी दहा रुपये मोजावे लागत आहेत. एका किलोत आकारानुसार साधारण वीस ते तीस लिंबू येतात. ज्यामुळे सध्या लिंबू उत्पादकांना चांगले दिवस आल्याचे पाहायला मिळत आहे.

प्रामुख्याने हिवाळ्यात लिंबाचे दर नियंत्रणात होते. मात्र, तापमानात जसजशी वाढ होत आहे. तसतशी लिंबांच्या भावातही वाढ होत आहे. पाच रुपयाला मिळणारा एक लिंबू दहा रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. तर प्रति किलो २०० रुपयांवर लिंबाचे भाव पोहोचले आहेत. घाऊक लिंबू घेणाऱ्यांना दर कमी करून दिले जातात. मात्र, एक किंवा दोन लिंबू घेणाऱ्यांना प्रति नग दहा रुपयाने विकत घ्यावा लागत आहे.



उन्हाळा संपेपर्यंत लिंबूचे दर असेच चढे राहतील, अशी शक्यता लिंबू व्यावसायिकांकडून व्यक्त केली जात आहे. कोल्हापूर, बेळगाव आदी बाजारांतून राज्यात लिंबाची आवक होत असते. मागे मॉन्सूनोत्तर आणि अवकाळी पावसाचा फटका हस्त बहाराला बसला. अपेक्षित फूल आणि फळधारणा झाली नाही. परिणामी सध्या बाजारात लिंबाची आवकच मंदावली आहे. त्यातुलनेत उष्णतेमुळे आवक मात्र मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे लिंबाचे भाव प्रति किलो २०० रुपयांवर पोहोचले आहेत. असे लिंबू बाजारातील जाणकारांकडून सांगितले जात आहे.

## थोडक्यात



### युद्धावर जाणाऱ्या सैनिकांना बसण्यास सीट देऊन त्यांचा आदर करा –माजी सैनिक

**बीड । प्रतिनिधी**

युद्धाच्या शक्यतेमुळे रजेवरचे सैनिक सीमेवर निघालेत.कोणत्याही प्रकारच्या वहानात स्वतः उठून त्याना बसू द्या.रिझर्वेशन म्हणजे मालकी नव्हे.ते आहेत म्हणून मी आहे ही जाणीव असली तर हे नकळत घडेल.त्यानी टॉयलेटजवळ,पायरीवर,दरवाजात वा पायदळी बसणं योग्य नाही.ते देशाचा अभिमान आहेत,रक्षक आहेत.तुम्ही बसायला द्या,ते तुम्हांला जगायला देतील.नंतर सीमेवर उभं रहायचंय म्हणून आत्ता बसू द्या.ट्रेन बसपर्यंत जायला चालत असतील तर आपल्या गाडीत घ्या.तुम्हाला ते बसायला सीट देणार नाहीत...प्राण देतील.आपल्यासाठी ते रिझर्वेशनच्या दिवसाआधीच निघालेत. गावातून निघताना संबंधित ग्रामपंचायत कार्यालया मध्ये त्यांचा यथोचित सन्मान करून गावकऱ्यांनी देखील त्यांना निरोप देण्यात यावा व त्यांना सहकार्य करावे असे आवाहन व्हायरल पोस्टद्वारे एका अज्ञात माजी सैनिकांनी केले आहे.

### अल्पवयीन मुलीची छेड काढल्याच्या प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीला जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आरोपीची बाजू प्रभावीपणे मांडणारे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.कमलकिशोर पारिख यांनी न्यायालयात ठोस युक्तिवाद सादर केला.




ही घटना दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी घडली होती. आरोपीने आपल्या घराशेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला एका कॅफे मध्ये बोलावून चुकीच्या हेतूने स्पर्श केला, असे पीडितेच्या तक्रारीत नमूद आहे. पीडितेने घडलेली घटना आईला सांगितल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.क्र.१८९/२५) दाखल करण्यात आला होता. संबंधित प्रकरणात आरोपीवर भारतीय दंड विधानातील (बीएनएस) कलम ७४, ३५१(२), ३५१(३), ३(५) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील (पोस्को ॲक्ट) कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. अटक झाल्यानंतर आरोपीला न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड.कमलकिशोर पारिख यांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला. त्यांनी सादर केलेल्या युक्तिवादाची दखल घेत जिल्हा व सत्र न्यायाधीश डी.डी.खोचे यांनी आरोपीस जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड.पारिख यांना ॲड.अक्षय कामळे व ॲड.सुरेखा शिंदे यांचे सहकार्य लाभले.

### युवतींना मिळाले स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण
### लाठी-काठी,तलवार बाजी,कराटे प्रकारात मोठ्या प्रमाणात सहभाग

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी तसेच श्रीमती कमल खुरसाळे न्यास आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिर २०२५ मध्ये जवळपास पावणेतीनशे मुली स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेत असून त्यांना बीदर (कर्नाटक) येथील राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक चंद्रकांत बलाढये, बापू सोळुंके, अंकुश गायकवाड, अकबर पठाण यांनी मार्गदर्शन केले

सकाळी साडेसहा वाजता राष्ट्रगीत आणि योगासनाने या महिला प्रशिक्षण शिबिराची सुरुवात व्हायची. त्यानंतर युवतींना प्रशिक्षण आणि प्रबोधनपर विविध मान्यवरांची व्याख्याने झाली या वर्षी शिबिराचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर तसेच आ. नमिता मुंदडा, सामाजिक कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचा शुभारंभ झाला. या आत्मभान शिबिरामुळेच स्वसंरक्षणाचा पाठ मुलींना मिळतो यातूनच अन्यायाविरोधात प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण होते लाठीकाठी प्रशिक्षणाचा फायदा भावी आयुष्यात निश्चितच विद्यार्थ्यांना होईल यासाठीच योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून हे शिबीर घेतले जाते. शिबिरातील सर्व उपक्रम चांगले असतात. योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक तथा योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहसचिव भीमाशंकर शेटे म्हणाले की, समाजात महिलावर होणारे अत्याचार पाहता अशी शिबिरे व्हायला पाहिजेत अंबाजोगाई व परिसरातील युवतींना स्व संरक्षणासाठी या शिबिराच्या माध्यमातून आम्ही गेल्या पंधरा वर्षापासून प्रशिक्षण देतोय या शिबिरात कुठल्याही शाळा महाविद्यालयातील मुली सहभागी होतात योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक आर.व्ही. सोनवळकर म्हणाले की, नवचैतन्याने ऊर्जा निर्माण करण्याचे काम शिबिराच्या माध्यमातून होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आठ दिवस चालणाऱ्या महिला आत्मभान शिबीरासाठी योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे सदस्य, योगेश्वरी शिक्षण संस्थेतील विविध विभागाचे कर्मचारी परीश्रम घेत असतात.

### जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. ७५३/२०२५**
**ॲड जाधव सी. बी.**
**कमलबाई लक्ष्मण गालफाडे वि. निरंक**

अर्जदार – १. कमलबाई भ्र. लक्ष्मण गालफाडे, वय–७७वर्षे, धंदा–घरकाम, रा.बाळापुर ता.जि.बीड ह.मु.घर नं. २३७३, नरपोली रोड, अण्णाभाऊ साठे नगर, नारपोली, भिंवडी ठाणे २. राजेंद्र पि. लक्ष्मण गालफाडे, वय–५१ वर्षे, धंदा–नौकरी, रा. बाळापुर ताजि.बीड ह.मु. विवेकानंद शाळेजवळ, गोविंद नगर, धानोरा रोड, बीड ३. अशोक पि. लक्ष्मण गालफाडे, वय–४८वर्षे, धंदा–मजुरी, रा.बाळापुर ता.जि.बीड ह.मु.घर नं. २३७३, नरपोली रोड, अण्णाभाऊ साठे नगर, नारपोली, भिंवडी ठाणे ४. सारिका भ्र.शिवाजी ससाणे, वय–३९वर्षे, धंदा–घरकाम, रा. आहेर लिंबगांव ता.जि.बीड

गैरअर्जदार– निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत लक्ष्मण पि. भानुदास गालफाडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलाआहे,

मयत लक्ष्मण पि. भानुदास गालफाडे हे दिनांक २३/०२/२०२५ रोजी राहते घरी मौजे बाळापुर ता. जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह न्यायालय सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे लक्ष्मण पि. भानुदास गालफाडे रा. बाळापुर ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १७/०६/२०२५.

आज दिनांक ०२/०५/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**स्वाक्षरीत**
**क.लि.**

**आदेशावरुन,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.**

# वाळू चोरी करणाऱ्या ५३ जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश

अंबड । प्रतिनिधी

**जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ , अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या मार्गदर्शनाने मौजे गोंदी शहागड आपेगाव या ठिकाणी अवैधरित्या गौण खनिज उत्खनन व चोरी करणाऱ्या ट्रॅक्टर लोडर यांच्यावर गुन्हे नोंद करण्यात येणार आहे. तिन्ही गावांमधून एकूण ५३ लोकांवर गुन्हे नोंद करण्याचे आदेश करण्यात आलेले आहे त्याचबरोबर सदरील लोकांची चल अचल संपत्तीचा शोध घेऊन त्यावर बोजे टाकण्यात येत आहे. सदर व्यक्तींचा शोध गोपनीय बातमीदारामार्फत घेण्यात आलेला होता त्यानंतर प्राप्त माहिती नंतर सदर बाबतीची खात्री मी स्वतः गावात गोपनीय रित्या येथे जाऊन केलेली आहे त्यामुळे सदर व्यक्तीवर सक्त कारवाई करण्यात येणार आहे.**

अजून इतर जे कोणी अवैधरित्या रिती उतरण करणारे माफिया व रिती चोर असतील त्यांच्यावर सुद्धा गुन्हे नोंद करण्याची व बोजा टाकण्याची कारवाई करण्यात येणार आहे. सध्या सर्व नदी पत्रामध्ये ज्या ठिकाणी रेती उत्खनन होते त्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे, त्यामुळे कोणीही अवैधरित्या सदर ठिकाणी जाऊ नये गेल्यास त्यांच्यावर सुद्धा सक्तकार्यवाही करण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम १६३ नुसार आदेश झाल्यानंतर सुद्धा त्या ठिकाणी वावर दिसून आल्यामुळे पोलीस ठाणे गोंदी यांना पत्र पाठवून सदर संचारबंदीचा भंग होत असल्याबाबतची कारवाई करण्याची सुद्धा निर्देश देण्यात आलेले आहेत अशी माहिती प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे. शहागड येथील असलेल्या गोदावरी नदीपात्रामध्ये मा.उपविभागीय अधिकारी अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली नायुब तहसिलदार महसुल १, मंडळ अधिकारी शहागड, ग्राम महसुल अधिकारी सजा आपेगांव व शहागड गावातील खालिल प्रमाणे पंच लोक बोलावून नदीपात्राची पाहणी करुन पंचनामा केला आहे.शहागड येथील गोदावरी नदीच्या पात्राची पाहणी करण्यात आली पाहणी दरम्यान गोदावरी नदीपात्रामध्ये जुन्या पुलाच्या बाजुला व महादेव मंदिराच्या पूर्व बाजूला आणि पश्चिम बाजुला व समर्थ कारखाना पाणीपुरवठा च्या पुर्वेस गोदावरी नदीच्या पात्राचो पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान गोदावरी पात्रामध्ये ठिकठिकाणी अवैधरित्या रेतीचे उत्खनन केल्याचे दिसून आले. सदर खडयातून रेतीचे अंदाजे १०० ते २०० ब्रास रेतीचे उत्खनन झाले असल्याचे दिसून आले. सदर नदीपात्रामध्ये दिनांक २४.०४.२०२५ पासून रात्रीसदर गोदाबरी नदीच्या पात्रामध्ये ट्रॅक्टरच्या लोडरने हायवा व ट्रॅक्टर व्दारे भरुन रेतीचे उत्खनन व वाहततूक केली असल्याचे उपस्थितांनी सांगितले. सदर (-१४४) लागू करण्यात आलेली असून प्रतिबंधित केलेले रेती उत्खनन व भरुन देणारेसाहित्य जसे की, जेसीबी, लोडरने तसेच वाहतूक करणारे ट्रैक्टर हायवा ट्रक, आढळून आले असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्याअनुषंगाने चौकशी केली असता गोपणीय खात्रीशीर बातमी दारामार्फत माहिती मिळाल्यानुसार चौकशी केली असता खात्रीशिर माहितीवरुन मो. शहागड येथील खालील ३१ व्यक्ती स्वतः घ्या ट्रॅक्टर लोडर व इतराच्या ट्रॅक्टर लोडरव्दारे गोदावरी नदीपात्रात संचारबंदी असतांना अवैधरित्या विनापरवाना रेती उत्खनन करुन ट्रॅक्टर ट्रक, हायवा भरुन दिल्या असल्याची माहिती मिळाली, त्यावरुन त्यांनी भारतीय नागरी संहिता १६३ (-१४४) चा भंग केला असून शासकीय आपेगांव ता. अंबड येथील विज्ञानेश्वर मंदिराच्या दक्षिण बाजूस असलेल्या गोदावरी नदीपात्रामध्ये मा. तहसिलदार, अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली मा. नायब तहसिलदार महसुल १. मंडळ अधिकारी शहागड, ग्राम महसुल अधिकारी सजा आऐगांव व कोतवाल आपेगांव यांनी दिनांक २९.०४.२०२५ रोजी दुपारी १.०० वा. गावातील खालिल प्रमाणे पंच लोक बोलावून नदीपात्राची पाहणी करुन पंचनामा केला आहे. पंचासमक्ष मौ. आपेगांव येथील श्री विज्ञानेश्वर मंदिराच्या दक्षिण बाजुस असलेल्या गोदावरी नदीच्या पात्राची पाहणी करण्यात आली पाहणी दरम्यान गोदावरी नदीपात्रामध्ये ठिकठिकाणी अवैधित्या रेतीचे उत्खनन केल्याचे दिसून आले. सदर खडयातून रेतीचे अंदाजे २०० ते ३०० ब्रास रेतीचे उत्खनन झाले असल्याचे दिसून आले. सदर नदीपात्रामध्ये दिनांक २४.०४.२०२५ पासून रात्री सदर गोदावरी नदीच्या पात्रामध्ये ट्रॅक्टरच्या लोडरने हायवा व ट्रॅक्टर व्दारे भरुन रेती तहसिलदार अंबड यांनी मौ. आपेगांव येथे पहाटे २.३० वा. धाड टाकून ६ हायवा जप्त केल्या दरम्यान पथकात असल्याने नदीपात्रातील १० ते १२ हायवा साष्टपिंपळगांव व इतर मार्गाने पसार झाल्या होत्या. त्याअनुषंगाने चौकशी क १ असता गोपणीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्यानुसार चौकशी केली असता खात्रीशिर माहितीवरुन मौ. आपेगांव येथील खालील ६ व्यक्ती स्वतः च्या ट्रॅक्टर लोडर व इतराच्या ट्रॅक्टर लोडरव्दारे गोदावरी नदीपात्रात संचारबंदी असतांना अवैधरित्या विनापरवाना रेती उत्खनन करुन ट्रॅक्टर ट्रक, हायवा भरुन दिल्या असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन त्यांनी भारतीय नागरी संहिता १६३ (-१४४) चा भंग केला असून शासकीय मालमत्तेची चोरी केलेली आहे. त्यामुळे शासनाचा महसूल बुडाला आहे. गोंदी येथील सिंद्धेश्वर पॉईट येथून वाळू उत्खनन सिद्धेश्वर पॉइंट येथील नदीपात्राची पाहणी करुन पंचनामा केलाअसून अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये गोदी येथील सिद्धेश्वर पॉइंट जवळ गोदावरी नदीपात्रातून अंदाजे १०० ते १५० ब्रासवाळूचे उत्खनन झालेबाबत तसेच गोपनीय खब-यामार्फत मिळालेल्या माहितीनुसार वाळूचे उत्खनन करुन वाहतूक करणा-या खालिल सोळा व्यक्तीचे वरील व्यक्तीविरुद्ध (ट्रॅक्टर धारक, लोडर धारक, हायवा धारक, ट्रकधारक, जैसीबी धारव ागरीक सुरक्षा संहिता १६३ (-१४४) फौजदारी प्रक्रिया संहिता नुसार व अवैध रित्या गौणखनिज हतूक केल्याबाबत, तसेच पर्यावरणाचा हास करणे बाबत, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६३ नन्वये नजिक असलेल्या पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी आपणास या कार्यालयाच्या वतीने प्राधिकृत करण्यात आले आहे.

## बैलगाडीत जाऊन पोलिसांची वाळू माफीयावर कारवाई ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे अंबड हद्दीत ७ में रोजी मध्यरात्री गोपनिय बादमीदाराकडून माहीती मिळाली कि, अंबड तालुक्यातील मठपिंपळगाव शिवारातील दुधना नदीपात्रात काही लोक हायवा व जेसीबीद्वारे अवैधरित्या गैणखणिज वाळुचे उत्खनन करुन चोरी करत असल्याची माहीती मिळाल्याने सदरील कारवाई करण्यासाठी सहा. पोलीस निरीक्षक अमोल गुरले , पोउपनि भगवान नरोडे, पो.ह.१२७२/दिपक चव्हाण, पो.शि ३४४/ अरुण , पो.शि. ६२६/भानुसे असे रात्री ०२.३० वाजताचे सुमारास वाळु माफीयांना चकवा देण्यासाठी एक बैलगाडी तात्काळ उपलब्ध करुन अडचणीच्या रस्त्याने मठपिंपळगाव शिवारात दुधाना



नदीपात्रात अचाणक छापा मारला असता सदर ठिकाणी एक हायवा, एक मिनी हायवा व एक जे.सी.बी असा एकुण ५५,००,०००/- रुपयेचा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आलेला आहे. याबाबत पोलीस ठाणे अंबड येथे गु.र.क्र. २४०/२०२५ कलम ३०३(२),६२,३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगीरी मा.श्री अजय कुमार बंसल पोलीस अधिक्षक, मा.श्री अयुष नोपाणी अपर पोलीस अधिक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सहा पोलीस निरीक्षक अमोल गुरले , पोउपनि भगवान नरोडे, पो.हे.कॉ दिपक पाटील, पो.कॉ. अरुण , भानुसे, स्वप्निल भिसे यांनी पार पाडलेली आहे.

## पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाची बारावी निकालात या वर्षी ही भरारी

पाटोदा । प्रतिनिधी

येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयाने १२,वी निकालात भरारी घेतली व आपली निकालाची यशस्वी परंपरा या वर्षी ही कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकुण निकाल ९४.०७% विज्ञान शाखेचा निकाल ९७.२४% टक्के तर कला शाखेचा ८९.८१% टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान शाखेतुन : १) सर्व प्रथम :- चि.बामदळे प्रणव ८७.६७% २) सर्व द्वितीय :- कु.काळे अश्वीनी ८६.६७%

*३) सर्व तृतीय :- कु.घुमरे ज्ञानेशवरी ८६.३३% कला शाखेतुन *३) सर्व प्रथम :- कु.नांदे मिना सुभाष ८०.५०%*

*२) सर्व द्वितीय :- कु.मिसाळ वैशाली विठ्ठल ७९.३३%* *३) सर्व तृतीय : - कु.जाधव यशोदा चक्रपाणी

७६.८३%* असे घवघवीत यश संपादन केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शिक्षणमहर्षी मा.श्री. शिवाजीराव (दादा) पंडित,अध्यक्ष माजी आ. मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब ) पंडित, सचिव मा.श्री.जयसिंह पंडित, गेवराई विधानसभेचे कार्यसम्राट आमदार मा.श्री.विजयसिंह पंडित, युवा नेतृत्व पृथ्वी राजे पंडित,युवा नेते रणविर (काका) पंडित, महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम,प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे,महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा.श्री. दिलीप भाऊ जाधव,मा.श्री. शिवभूषण जाधव,आमचे मार्गदर्शक श्री.अमृत डावकर सर, प्रशासकीय अधिकारी श्री.प्रमोद गोरकर सर,प्रा.काशीनाथ गोगुले सर,संस्थेचे लेखापाल श्री.प्रताप हातोटे सर,व सर्व वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक वृंद आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाने १२,वी निकालात मिळविलेल्या यशाबद्दल सर्व स्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे.

# पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार व दडपशाहीमुळे शेतकरी आक्रमक; जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांना लेखी तक्रार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार, शेतकऱ्यांना मावेजा न देणे, एकसारखा मावेजा न देणे, धनादेश न वटणे आणि पुन्हा वरून पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही करणे असे प्रकार सर्रास सुरू असुन आज दि.७ बुधवार रोजी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांच्या शेतातुन विद्युत तारा ओढणा-या पवनचक्की कंपन्यांना विरोध केल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. पाटोदा पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व पोलीस प्रशासन आणि अतिरीक्त कुमक व दोन पोलिसांच्या व्हॅन घटनास्थळी दाखल होत्या. तारा ओढण्यास विरोध करणाऱ्या व जबरदस्तीने तारा ओढल्यास जीवाचे बरं वाईट करून घेईन असं म्हणणा-या अक्षय बाळासाहेब मुळे या शेतकरी पुत्राला पोलिसांनी पकडुन व्हॅन मध्ये टाकुन पाटोदा




पोलिस स्टेशनला नेण्यात आले. पाचेगावच्या पिडीत शेतकर्यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक बीड तसेच उपविभागीय अधिकारी पाटोदा, तहसीलदार पाटोदा आणि पोलिस स्टेशन पाटोदा यांना मावेजा देईपर्यंत तारा ओढण्याचे काम बंद ठेवून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे. निवेदनावर विकास कृष्णाथ गिरे, बाळासाहेब भानुदास मुळे , सतिश बाबुराव गिरे ,विष्णू राम सावंत ,रहिम मक्तुम शेख , मनोज विजय गिरे , विष्णु चांगदेव गिरे , प्रकाश महादेव सावंत,काकासाहेब मारोती गिरे,हनुमंत राम सावंत आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.


जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांनी पिडीत शेतकऱ्यांना न्याय द्यावा :- डॉ.गणेश ढवळे

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांची कैफियत ऐकुन सखोल चौकशी करून त्यांना न्याय द्यावा. पवनचक्की कंपन्यांकडुन सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दडपशाही करण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असुन यामुळे पोलिस प्रशासन व जिल्हा प्रशासनाची जनसामान्यात प्रतिमा मलिन होत असून शेतक-यांना कोणीही वाली नसल्याने प्रशासनाने शेतकऱ्यांचे तारणहार व्हावे अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

### आज शिवचरित्र व्याख्याते कल्याण महाराज काळे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

कपिलधारवाडी येथे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीच्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आज गुरुवार दि. ८ मे २०२५ रोजी रात्री नऊ ते अकरा या वेळेत सुप्रसिद्ध शिवचरित्र व्याख्याते ह.भ.प कल्याण महाराज काळे यांचे किर्तन सेवा होणार आहे तरी या श्रवण भक्तीचा सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.



## रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी, बीड जिल्हा रुग्णालयात उपचारात हलगर्जीपणा तर वनविभाग अनभिज्ञ

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २० लाखांपर्यंत मदत दिली जाते.१० लाख रूपये धनादेशाद्वारे तर १० लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरमहा व्याज देणा-या संयुक्त खात्यांमध्ये जमा केले जातात. तसेच अपंग झाल्यास ५ लाख रुपये, व्यक्ती गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये व किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपये औषधोपचारासाठी खर्च दिला जातो. मात्र बहुतेक वेळा याची माहिती वनविभागाला दिली जात नसल्याने जखमी मदतीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते कारण मदतीसाठी हल्ला झाल्यानंतर ४८ तासाच्या आत वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे अपेक्षित असते तरच लाभास संबंधित पात्र ठरतो. नानासाहेब श्रीरंग हजारे यांच्या बाबतीत हल्ल्याची घटना उलटून १५ दिवस झाल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांच्याशी संवाद साधत बीड जिल्हा रुग्णालयातील कागदपत्रे तपासून सहानुभूती पुर्वक विचार करून मदत द्यावी अशी विनंती केल्यानंतर सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन अशोक काकडे यांनी दिले आहे.

बीड जिल्हा रुग्णालयात हेळसांड ; रानडुकराच्या हल्ल्यातील जखमी शेतकरी नानासाहेब हजारे यांची खंत

दि.२० एप्रिल रोजी रात्री १० वाजता बीड तालुक्यातील पिंपरी गावातील शेतकरी नानासाहेब श्रीरंग हजारे हे तळ्याशेजारी असलेल्या शेतातील वैरणीच्या कडब्या शेजारी झोपलेल्या अवस्थेत असताना तळ्यावर पाणी पिण्यासाठी आलेल्या रानडुकरांनी हल्ला केला.त्यात त्यांचा जबडा फाटला असुन पायाला दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी औषधोपचारासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. त्याठिकाणी उपचाराची सोय नसल्याने त्यांना रूग्णवाहिकेतुन नेकनुर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले. रात्री



१२ वाजता नेकनुर ग्रामीण रुग्णालयातुन उपचाराची सोय नसल्याने बीडच्या जिल्हा रुग्णालयात पाठवले त्याठिकाणी केवळ एक इंजेक्शन दिले आणि एकदाच पट्टी केली. नानासाहेब हजारे यांनी उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला असुन सर्वसामान्य लोकांकडे जिल्हा रुग्णालयात लक्ष देत नसल्याची खंतही डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवली.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यानंतर ४८ तासात कळवुन पंचनामा हि अट शिथिल करावी :- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यात मागच्या वर्षभरात शेतकरी व जनावरांवर वन्यप्राण्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. परंतु याची माहिती विभागीय वन कार्यालयाकडे उपलब्ध नसून ही माहिती रेंज कार्यालयाकडे असल्याचे तेथील कर्मचारी सांगतात. यावरून वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत किंवा जखमींना मदत दिली नसल्याचे दिसत आहे. बीड शहरातील विभागीय वन अधिकारी हे जिल्ह्याचे वनविभागाचे मुख्य कार्यालय असल्याने त्यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध असायला हवी. मात्र महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमींना मदत मिळण्यासाठी ४८ तासांच्या आत कळवुन ३ दिवसांच्या आत पंचनामा होणे बंधनकारक असुन तरच लाभ मिळतो.मात्र याविषयी शेतकऱ्यांना माहिती नसल्याने बहुतेक जखमी शासकीय मदतीपासून वंचित रहात असुन अटी मध्ये शिथिलता आणावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# खरीप हंगामासाठी,दर्जेदार बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून द्या

## पीक कर्ज वेळेत वितरित करा, आ.सुरेश धस यांच्या खरीप आढावा बैठकीत

आष्टी (प्रतिनिधी)

यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे सांगितले जात असल्यामुळे पुरेसा पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांना पेरणीसाठी दर्जेदार बी बियाणे आणि योग्य दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने नियमांचे काटकर होणे पालन करावे बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप करावे कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांपर्यंतच्या बांधावर पोचून त्यांना मार्गदर्शन करावे असे सूचना आमदार सुरेश धस यांनी तालिकास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीमध्ये सर्व खातेप्रमुखांना दिल्या आहेत.



या आढावा बैठकीसाठी पाटोदा उपविभागीय अधिकारी वसीमा शेख,आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, कृषी अधिकारी सुभाष साळवे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी,पाटोदा तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके,शिरूर कृषी अधिकारी पवार आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार संघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार )या तीन ही तालुक्यासाठी बियाणे उपलब्ध व्हावेत म्हणून आष्टी बफर स्टॉक (रॅक पॉईट) करण्यासाठी आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असून,खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत व माफक दरात दर्जेदार खते, बी-बियाणे मिळतील याची खात्री करा, यासाठी वेळोवेळी निविष्ठांची तपासणी करा असे सांगत आ.सुरेश धस म्हणाले..ऊस, ज्वारी, सोयाबीन, भुईमूग व कडधान्य पिकांसाठी खरीप हंगामात पाऊस चांगला होईल,असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे; परंतु पाऊस कमी झाला तरीही उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म नियोजन करा...मतदारसंघातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक ते सहकार्य करा. २०२५-२६ मध्ये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करा.मतदार संघातील शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती देऊन शासकीय योजनांचा लाभ,विमा सुरक्षा मिळवून द्या.तसेच पीक कर्ज मुदतीत वितरित करा.स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेसह शेतकऱ्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढा.शेतकऱ्यांना विम्याची रक्कम व कर्जवाटप मुदतीत करा.शेतकऱ्यांना मशागत व पेरणी पूर्व मार्गदर्शन करा.क्षारपड जमिनीत सुधारणा होण्यासाठी तसेच या जमिनीची उपयुक्तता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर भर द्या.मतदारसंघातील रेशीम उत्पादकता वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करा.'

### कृषी सहाय्यक यांनी बांधावर जावे

शेतकऱ्यांना कृषी योजनेची माहिती देण्यासाठी दुपारी ११ वा.नाही तर सकाळी ७-८ वा.जाऊन माहिती देणे गरजेचे असताना हे कृषी सहाय्यक वेळेचे बंधन ठेवत नाहीत.अशा कृषी सहाय्यक,कृषी मंडळ अधिकारी यांच्यावर तालुका कृषी अधिकारी यांनी ठेवणे गरजेचे आहे.पण आता यावर जर कुणाचा वचक राहिलेला नाही. परंतु जर कुणी कामात हलगर्जीपणा केला तर कुणाचीही गय केली जाणार नाही.कृषी सहाय्यक यांनी बांधावरच जावे अशी सूचना आ. सुरेश धस यांनी दिल्या.

आष्टी पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील लागवडी लायक हेक्टरी क्षेत्र,आणि त्या क्षेत्रामध्ये पिकांनुसार लागवड योग्य क्षेत्र व त्या प्रमाणात उपलब्ध होणारे खत व बियाणे यांच्या बाबतचा तुटवडा तसेच आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी खत व बियाणांसाठी महामंडळाचा असणारा रॅक पॉइंट हा परळी या ठिकाणी असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्याला खतांचा दरवर्षी तुटवडा जाणवतो त्यामुळे याबाबत संबंधितांशी बोलून आष्टी मतदार संघासाठी आष्टी येथे नवीन रॅक पॉईंट मिळवण्यासाठी योग्य पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली आहे तसेच बीज प्रक्रिये बाबत शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती व त्यासाठी लागणारे औषधे उपलब्ध होत नाहीत व कृषी सहाय्यकांकडून प्रात्यक्षिक दिले न गेल्यामुळे अनेक शेतकरी कुठलीही बीज प्रक्रिया न करता आपल्या बियाणांची शेतामध्ये पेरणी अथवा लावणी करतात तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती तूर आणि कापूस हे प्रमुख पीक घेतले जाते ◀◀ पान ३ वर

# परळीत कर्कश आवाज करणाऱ्या वाहनासह नो पार्किंग वाहनावर कारवाई

## जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांचे संयुक्त पथक कारवाई



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत यांच्या आदेशानुसार अप्पर अधीक्षक चेतना तिडके अप्पर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली परळी पोस्टचे पो नि नाचन स पो नि सुभाष सानप जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने परळी शहरातील कर्कश आवाज फॅन्सी नंबर प्लेटनो पार्किंग झोन मधील वाहने लावणाऱ्या वाहनावर धडक कारवाई ची मोहीम सुरू केल्याने वाहन चालकात खळबळ माजली आहे परिसरातील परळी शहरातील धूम स्टाईल वाहने चालवणाऱ्यामुळे अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत नागरिकांनी मागणी करू नये पोलीस कुठलीही कारवाई या वाहनचालकावर करीत नसल्याचा आरोप परळीकर करीत होते मात्र अचानक दिनांक बुधवार ७/५/२०२५ रोजी वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्तपणे लक्ष्मी टावर बस स्थानक इटके कॉर्नर परळी उड्डाणपूल या ठिकाणी वाहतूक पोलीस पथकाने वाहन परवाना तपासणी चालू केली संचालक अलगद शिंाच्या ◀◀ पान ३ वर

# पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असलेली आमची ग्रामपंचायत-सरपंच आशा शिरसाठ

## स्वत:च्या आर्थिक हितापोटी ग्रामपंचायतीची बदनामी करण्याचा प्रयत्न



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

ग्रामपंचायतीची मी महिला सरपंच असून माझे काम पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असून सर्वांना विश्वासात घेऊन आजवर कामे करण्यात आली आहेत. काही विघ्न संतोषी लोक स्वताच्या पोळीवर तुप ओढून आर्थिक फायदा साधून घेण्यासाठी ग्रामपंचायतीची बदनामी करत आहेत. विकासाचा लेखाजोखा आरश्या प्रमाणे ठेवला आहे. विनाकारण कोणी गरळ ओकण्याचा प्रयत्न करू नये. विकासकामाचा हिशोब व कामे आम्ही कधीही समोर दाखवू असे सरपंच आशा आण्णासाहेब शिरसाठ यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

आष्टी तालुक्यातील आरणविहरा-तांगडखेल ग्रुप ग्रामपंचायत असून, या ग्रामपंचायत अंतर्गत गावात विविध निधी सोबतच अनेक ठिकाणी पदरमोड करून विकास कामे केली आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आली तसेच दलितवस्ती सुधार योजनेची कामे, रोजगार हमी योजनेचे कामे, पथदिवे, गाव अंतर्गत रस्ते, शाळेची संरक्षण भिंत, अनेक वर्षांपासून स्मशानभूमी नव्हती, तो प्रश्न मार्गी लावला आहे तसेच सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावला, यासह अनेक कामे दर्जेदार केली आहेत. पण गावातील काही विघ्न संतोषी लोकांनी मी महिला सरपंच असल्याने स्वताच्या आर्थिक फायदा व्हावा म्हणून बोगस केलेल्या कामाचे पैसे घरात जावेत. यासाठी ग्रामपंचायतीची व ◀◀ पान ३ वर

# आष्टीचे गटशिक्षणाधिकारी पद पुन्हा प्रभारीच

## गेल्या अनेक वर्षांपासून पदाचे गट शिक्षणाधिकारी मिळेनात

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाला गेल्या अनेक वर्षापासून पदाचे गट शिक्षणाधिकारी मिळत नाहीत. दिनांक ३० एप्रिल रोजी आष्टीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी पदाचे गटशिक्षणाधिकारी येतील अशी अपेक्षा होती परंतु पुन्हा एकदा आष्टीचे गटशिक्षणाधिकारी पद हे प्रभारीच राहिले आहे. सीमा टकले यांना प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली आहे.

आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी हे पद गेल्या अनेक वर्षांपासून प्रभारी राहिले आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर सोनवणे यांचा कार्यकाळ सोडला तर इतर प्रभारी राहिलेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांचा कार्यकाळ हा चांगला राहिला नाही. सुधाकर यादव यांनी आष्टी येथील शिक्षण विभागाला चांगली सेवा देत शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले. दिनांक ३० एप्रिल रोजी सुधाकर यादव हे नियत वयमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून सीमा टकले यांना नियुक्ती देण्यात आले आहे. त्यामुळे आष्टी तालुक्याला पदाचे गटशिक्षण अधिकारी केव्हा मिळणार असा प्रश्न शिक्षण प्रेमीसमोर उभा ठाकला आहे.

# चौसाळा बसस्थानकाचे बांधकाम जोरात प्रवाशी निवारा करण्याच टाळाटाळ

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा तालुका बीड येथील बसस्थानकाच्या कामाला सुरुवात झाली आहे ऐन उन्हाळा असताना प्रवाश्यांच्या निवाऱ्याची सोय नाही कॉन्ट्रॅक्टर कडून कमालीची टाळाटाळ केली जात आहे

भर उन्हाळा असताना ही प्रवाश्यांना निवारा नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत तरी महामंडळाच्या अधिकाऱ्याने तातडीने लक्ष देऊन चौसाळा बस स्थानक वर प्रवाशी निवारा ची सोय करावी. चौसाळा बसस्थानकाच्या नव्याने सुरू झालेल्या बांधकाम अतिक्रमण हटविण्यामुळे काम सुरू झाले संबधित कॉन्ट्रॅक्टर प्रथमतः प्रवाश्यांच्या साठी निवारा बांधुन च काम सुरू करणे आवश्यक होते परंतु निवाऱ्याची व्यवस्था न करता भर उन्हाळ्यात प्रवाशांना वाऱ्यावर सोडून बसस्थानकात निवारा नसल्याने हाल सुरू आहेत तरी बसस्थानकावर प्रवाशी निवारा चि सोय करावी अन्यथा चौसाळा नागरिकांना प्रवाशी निवारा बांधकामासाठी आततायी मार्गाचा अवलंब करावा लागेल अशी मागणी प्रवासातून केली जात आहे.

# जायकवाडी प्रकल्प उजव्या कालव्याच्या नुतनीकरणामुळे माजलगाव धरणात पूर्ण क्षमतेने पाणी उपलब्ध होणार - आ.सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी



पैठण उजवा कालवा हा १३२ कि.मी. लांबीचा असून कालव्याचे काम सन १९८४ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असून बहुतांश कामे रोजगार हमी योजना मार्फत करण्यात आलेली आहे.पैठण उजव्या कालव्याद्वारे छ.संभाजीनगर, आहिल्यानगर व बीड जिल्ह्यातील एकुण ४१६८२ हे. सिंचन होते.या कालव्याची संकल्पीय पाणी वहन क्षमता २२५० क्युसेस एवढी आहे. परंतु आज पर्यंत उजव्या कालव्यातून ८०० ते ९०० क्युसेस पाणी वहन क्षमता होत होती. या मध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती व अपव्यय होत होता.त्यामुळे माजलगाव धरणात केवळ जायकवाडी प्रकल्पातुन ८०० ते ९०० क्युसेस पाणी उपलब्ध होत होते. माजलगाव धरणात २२५० क्युसेसने पाणी उपलब्ध व्हावे यासाठी उजव्या कालव्याचे १३२ कि.मी.चे आधुनिक पध्दतीने नूतनीकरण करण्याची आवश्यकता होती. त्यामुळे मागील २ ते ३ वर्षापासून सतत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून जायकवाडी टप्पा -२ माजलगाव धरणासाठी उजव्या कालव्याचे नूतनीकरण करण्यासाठी ५२० कोटी रू.चा निधी मंजुर करून घेण्यात आला.या कालव्याचे नूतनीकरणाचे ◀◀ पान ३ वर

# शहर वासियांना चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा व घंटागाडी नियमित चालू करा - गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी

बीडकरांच्या जिव्हाळ्याचा व मुलभूत असा पाणीप्रश्न, घंटागाडी, स्वच्छ्तेसह विविध प्रश्नांवर आज काँग्रेसचे गणेश दादा बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात नगर पालिका प्रशासनाला घेराव घालन्यात आला.



बीड शहरवासीयांची प्रचंड अवहेलना नगर पालिका प्रशासनाकडून सुरु असुन महिनाभरात एकदा ते पण अस्वच्छ पाणी शहरात सोडण्याचा महाप्रताप नगर पालिका करत असुन तो तत्काळ थांबवावा व शहरवासीयांना किमान चार दिवसाला स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा. त्याच बरोबर शहरात कचरा गोळा करण्यासाठी असलेली नियमित घंटागाडी फक्त नावालाच आहे की काय ती कुठेही नियमितपणे आढळुन येत नाही. ती नियमित शहराच्या सर्व भागात घंटागाडी तत्काळ सुरू करण्यात यावी. शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग उचलण्यात यावेत. शहरातील नाल्या चार चार महिने नकाढल्यामुळे कोंडलेल्या आहेत त्या पहिल्याच पावसात तुडुंब भरुन रस्त्यावर गटारगंगा वाहील यासाठी नाल्या तत्काळ काढण्यात याव्यात व किमान आठ दिवसाला नियमित सर्व नाल्या काढल्या जाव्यात. त्याच बरोबर नगर पालिकेने जमा केलेला कचरा शहरात किंवा श ◀◀ पान ३ वर

# कोणत्याही वेळेस वीज पुरवठा खंडीत होतो, नागरिक त्रस्त

**अंबाजोगाई । नागनाथ वारद**

नेमके उन्हाळ्यातच अंबाजोगाई शहर व परिसरात अनियंत्रित पद्धतीने भारनियमन सुरु झाले असून उन्हामुळे असह्य उकाडा आणि भारनियमन यामुळे नागरिक त्रस्त आहेत. कुठलेही वेळापत्रक न देता दिवसात कोणत्याही वेळी भारनियमन करण्यात येत आहे. खरे पाहता वसुलीचे प्रमाण चांगले आणि वीजचोरी कमी असलेल्या ठिकाणी भारनियमन करण्यात येत नसते हा नियम असतानाहीङ्ग महावितरणकडून अनियंत्रित भारनियमन करण्यात येते भारनियमनाला कसलेही वेळापत्रक नाही. रात्री-अपरात्री, पहाटे, दुपारी अशी कोणत्याही वेळेस वीजपुरवठा खंडित केला जातो. दिवसभरात



कधीही, कोणत्याही वेळेस भारनियमन केले जाते. आधीच वाढलेल्या तापमानामुळे असह्य उकाडा आणि त्यात नियोजनशून्य असलेले अनियंत्रित भारनियमन यामुळे महिला, बालकांसह व्यापारी, शेतकरी सर्वचजण त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे भार नियमनामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. एवढे तुघलकी अनियंत्रित भारनियमन कोठेही नाही. त्यामुळे महावितरण विरोधात रोष वाढलेला आहे. ठिकाणी वीजचोरीचे प्रमाण नगण्य आहे. जिथे वसुली चांगली आणि वीजचोरी नसते त्या ठिकाणी भारनियमन करू नये असे असतानाही भारनियमन चुकलेले नाही.ङ्गग्रामीण भागात सातत्याने भारनियमन होत असल्याने शेतीपंपाला अत्यंत कमी वीज मिळते.

कमी दाबाने पाणी पुरवठाङ्गङ्गधनेगावच्या पंपहाऊसवर व्होल्टेज कमी भेटत असल्याने पाणी उपसा कमी होत असून त्यामुळे अंबाजोगाईत विलंबाने शिवाय कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे.

# संत बंकटस्वामी महाराज यांनी तळागाळात परमार्थ रुजवला त्यामुळे अध्यात्मिक क्रांती झाली - महादेव महाराज चाकरवाडीकर

## संत बंकटस्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव पहिला दिवसाचे कीर्तन पुष्प संपन्न

बीड । प्रतिनिधी

संत बंकटस्वामी महाराज यांनी तळागाळात परमार्थ रुजवला. त्यांच्यामुळेच अध्यात्मिक क्षेत्रामध्ये खूप मोठी क्रांती झाली असं प्रतिपादन श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, श्री ह भ प विष्णुपंत लोंढे गुरुजी, श्री ह भ प बाबासाहेब महाराज कदम, श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

वारकरी संप्रदायातील महानसंत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास मंगळवारी थाटात सुरुवात झाली पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेतील पहिलाच अभंग चिंतन रुपी सेवेकरता निवडला.

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ।।१।।
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ।।ध्रु.।।
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी ।
तेथें दुश्चिंत झणी जडों देसी ।।२।।
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म
।
जे जे कर्मधर्म नाशवंत ।।३।।

या अभंगावर चिंतन मांडताना महादेव महाराज यांनी जगद्गुरु तुकाराम महाराज यांची अभंग गाथा निर्मिती कशी झाली याचा इतिहास सांगितला. संत नामदेव महाराजांनी ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरूवार, दि.८ मे २०२५ । पान ७

# पुण्यात 'मिशन सिंदूर' चा विजयोत्सव; श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर महाआरती

**पुणे । प्रतिनिधी**

वंदे मातरम..., भारत माता की जय..., नरेंद्र मोदी यांचा विजय असो असा घोषणा देत मिशन सिंदूरचा जल्लोष करण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची महाआरती करण्यात आली.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा पाकिस्तानमध्ये घुसून घेतलेला बदला हे भारतीय सैन्याच्या शौर्याचे प्रतीक आहे. या वीर जवानांना बळ देण्यासाठी आणि 'मिशन सिंदूर' चा विजय उत्सव साजरा करण्यासाठी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या चरणी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कसब्याचे आमदार आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ची आरती करण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक धनंजय जाधव, विशाल धनवडे, प्रमोद कोंढरे यांसह महिला पदाधिकारी आणि भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





यावेळी बोलताना आमदार हेमंत रासने म्हणाले, ज्या दिवशी २७ निरपराध पर्यटकांवर अतिरकेयानी हल्ला केला. त्याच दिवशी नरेंद्र मोदी परदेशातून तर अमित शहा घटनास्थळी पोहचले त्याचदिवशी दोघांनीही या घटनेचा निषेध करीत याचे उत्तर दिले जाईल असे सांगितले होते. संपूर्ण विश्वात मोदी साहेब भारत शांतता आणि विकसित देश म्हणून प्रगती करीत असताना आशा पद्धतीने कोणी वाकड्या नजरेने पाहत असतील तर नकीच असा पद्धतीने उत्तर दिले जाईल. ज्या २७ पर्यटकांचा मृत्यू झाला त्यांना मोदी सरकार आणि भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान मधील अतिरेक्यांच्या नऊ स्थळांवर हल्ले करून खऱ्या अर्थाने आदरांजली दिली आहे.

# पळशीच्या ग्रामसेवकाला लाच घेताना रंगेहाथ पकडले

**बारामती । प्रतिनिधी**

ठेकेदाराचे बिल काढण्याच्या बदल्यात चार टक्के प्रमाणे ३० हजार रुपयांची मागणी करत २५ हजार रुपये लाच स्वीकारणाऱ्या पळशी (ता. बारामती) येथील ग्रामसेवकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहात पकडण्यात आले. कांता बापूराव काळाणे (वय ५७) असे कारवाई झालेल्या ग्रामसेवकाचे नाव आहे.

यात्रकरणी काळाणे यांच्या विरोधात वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. एका शासकीय ठेकेदाराने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारदार हे परवानाधारक ठेकेदार असून त्यांनी पळशी ग्रामपंचायत हद्दीत एका पाणी साठवण सिमेंट बंधाऱ्याचे काम केले होते. या कामाचे बिल १६ लाख ४६ हजार रुपये असून हे बिल मंजूर होण्याकरता काळाणे यांनी ठेकेदाराकडे बिलाच्या चार टक्के प्रमाणे ६० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. या कामाच्या बिलाचा १४ लाख ९६ हजाराचा पहिला धनादेश देताना काळाने यांनी ६०:हजार रुपयापैकी ३० हजार रुपये रोख स्वरूपात घेतले होते. उर्वरित



१ लाख ५० हजाराचे बिल काढण्यासाठी काळाने यांनी तक्रारदार यांच्याकडे ३० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडी अंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची शहानिशा एसीबीकडून करण्यात आली. त्यानंतर पंचा समक्ष सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले.

त्या अनुषंगाने बुधवारी (दि. ७) एसीबीकडून सापळा रचण्यात आला. पळशी गावचे हद्दीत एका रस्त्या नजीक तक्रारदार यांच्याकडून २५ हजार रुपये स्वीकारताना काळाने यांना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई एसीबी चे पोलीस निरीक्षक अमोल भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

# दहशतवाद्यांनी ज्या प्रकारे आमचे कुंकू पुसले, त्याला हे योग्य प्रत्युत्तर; संतोष जगदाळे यांच्या पत्नीने व्यक्त केले समाधान

**पुणे । प्रतिनिधी**

पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले आहे. बुधवारी (७ मे) रात्री उशिरा भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ले केले.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या सुमारे १५ दिवसांनंतर भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून हा बदला घेतला आहे. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकनंतर भारतीय सैन्याने एअर स्ट्राईकद्वारे केलेला सर्वात मोठा हवाई हल्ला आहे.

ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकून डोळ्यात पाणी आलं

पहलगामधील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पुण्याच्या संतोष जगदाळे यांच्या पत्नीने भारतीय सुरक्षा दलांनी संयुक्तपणे केलेल्या या मोहिमेवर समाधान व्यक्त केले आहे. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना प्रगती जगदाळे म्हणाल्या की, दहशतवाद्यांनी ज्या प्रकारे आमचे कुंकू पुसले, त्याला हे एक योग्य प्रत्युत्तर आहे. या ऑपरेशन सिंदूर योग्य नाव दिले आहे. दहशतवाद्यांनी मोदी यांच्या लेकींचे सिंदूर पुसलं. पंतप्रधान मोदी यांना त्याची जाणीव आहे. ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकून डोळ्यात पाणी आलं. मी सरकारचे मनापासून आभार मानते, असे म्हणत त्या भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.




दरम्यान, भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदलाने संयुक्तपणे ऑपरेशन सिंदूर राबवले. या मोहिमेत मंगळवारी रात्री उशिरा पीओकेमधील मुजफ्फराबाद, मदिरके आणि कोटली येथे एअर स्ट्राईक केली. भारताच्या या हवाई हल्ल्यात १२ दहशतवादी ठार झाले आहेत तर ५५ दहशतवादी जखमी झाल्याचे वृत्त आहे. यानंतर आता संपूर्ण पाकिस्तान हादरला आहे. जशिीरींळेप डळपवी ।

दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त

भारतीय लष्कराने भारतातील दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देणाऱ्या जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैय्यबाच्या वरिष्ठ नेतृत्वाला लक्ष्य करण्याच्या उद्देशाने हल्ल्यांसाठी संबंधित ठिकाणे निवडली होती. त्यानंतर हे दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. भारताने केलेल्या या कारवाईमुळे पाकिस्तानने कराची आणि लाहोरचे हवाई क्षेत्र ताबडतोब बंद केले. याशिवाय लाहोर आणि सियालकोट विमानतळ पुढील ४८ तासांसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.

# पुणे हादरलं! दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार; सावत्र भावानेच केलं अश्लील कृत्य

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. धनकवडी आणि कोंढवा या भागातून या घटना उघडकीस आल्या आहेत. धनकवडीत एका तरूणाने नऊ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केले. धक्कादायक म्हणजे पीडित मुलीसोबत अश्लील कृत्य करून तिला जीवे मारण्याची धमकीही दिली. मुलीच्या आईला ही गोष्ट समजल्यानंतर मुलीच्या आईच्या तक्रारीवरून धनकवडीतील २१ वर्षीय तरूणाविरोधात पोस्को अंतर्गत सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दुसरीकडे कोंढवा खुर्द परिसरातही एका ९ वर्षांच्या मुलीवर तिच्या सतरा वर्षांच्या सावत्र भावाने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण या घटनेमुळे संपूर्ण कोंढवा परिसरात खळबळ उडाली आहे. पाच वर्षांपूर्वी ७ ऑक्टोबर २०२१ रोजी पीडित मुलगी घराच्या अंगणात बसली असतना आरोपी तिथे गेला आणि त्याने मुलीला अश्लील स्पर्श करत तिचा विनयभंग केला. दीपक सुधीर मंडल (२८ वर्षे आसाम) असे या आरोपीचे नाव आहे. विशेष मुलीशी अश्लील कृत्ये करणाऱ्या या नराधमाला सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या परप्रांतीय तरुणाला न्यायालयाने ५ वर्षे सक्त मजुरी, २ हजार रुपयांचा दंड सुनावण्यात आला आहे.



पत्नीचा मृतदेह गाडीवर घेऊन फिरत होता

पुण्यातून समोर आलेली एक धक्कादायक घटना सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. नांदेड सिटी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मध्यरात्री सुमारे दीडच्या सुमारास एका तरुणाला त्याच्या पत्नीचा मृतदेह दुचाकीवर घेऊन फिरताना पोलिसांनी रंगेहाथ अटक केली. या प्रकारामुळे स्थानिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राकेश रामनायक निसार असून, त्याने वैयक्तिक कारणावरून रागाच्या भरात पत्नीची गळा दाबून हत्या केली. मृत महिलेचे नाव बबीता राकेश निसार असे आहे. ही घटना सोमवारी रात्री उशिरा घडली. पत्नीचा खून केल्यानंतर आरोपी राकेशने तिचा मृतदेह दुचाकीवरून नेऊन फेकून देण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला मध्यरात्री रंगेहाथ अटक केली. या थरारक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पुण्यातील नांदेड सिटी परिसरात उघडकीस आलेल्या पत्नीच्या खुनाच्या प्रकरणाने पुन्हा एकदा शहर हादरून गेले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राकेश रामनायक निसार (अटक आरोपी) याने सोमवारी रात्री उशिरा वैयक्तिक वादातून पत्नी बबीता राकेश निसार हिचा गळा दाबून खून केला. हत्या केल्यानंतर राकेश बबीताचा मृतदेह दुचाकीवर घेऊन भूमकर पुलाकडून स्वामीनारायण मंदिराच्या दिशेने जात होता. यावेळी आंबेगाव आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे गस्तीदल परिसरात गस्त घालत होते. संशयास्पद हालचाली पाहून पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली. तपासणीदरम्यान मृतदेहासह धक्कादायक वास्तव समोर येताच पोलिसांनी त्वरित कारवाई करत राकेशला ताब्यात घेतले.

# पाकिस्तानने अजूनही धडा घेतला नसेल तर; कौस्तुभ गनबोटेंच्या पत्नीची प्रतिक्रिया

**पुणे । प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगामध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निष्पाप भारतीय नागरिकांना आपले प्राण गमावावे लागले होते. या भ्याड हल्ल्याचे भारतवासीयांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदविला होता. या हल्ल्याचा चोख प्रत्युत्तर भारताने दिले आहे.


आज मध्यरात्री भारतीय सैन्याने पीओकमधील ९ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईट केला आहे. या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिंदूर हे नाव देण्यात आले होते. या हल्ल्यात जैशच्या ३ कमांडरसह ९० हून अधिक दहशतवादी ठार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

भारताने दहशतवादी तळांवर केलेल्या हवाई हल्ल्यावर सेलिब्रेटींपासून अनेकांनी कौतुक केले आहे. दरम्यान, पर्यटकांवर गोळ्या झाडल्यानंतर दहशतवाद्यांनी मोदीला जाऊन सांगा की आम्ही काय केलं असं काही महिलांना म्हटलं होतं. अशा दहशतवाद्यांना आता मोदींनी चोख प्रत्युत्तर दिलं आहे, अशी प्रतिक्रिया गनबोटे यांच्या पत्नी संगीता गनबोटे यांनी दिली आहे.




संगीता गनबोटे म्हणाल्या, ऑपरेशन सिंदूर हे अत्यंत समर्पक नाव आहे. मोदींनी अत्यंत योग्य पाऊल उचचलं आहे. दहशतवादी म्हणाले होते की, मोदीला जाऊन सांगा की आम्ही काय केलंय, त्याला आता मोदींनी चोख प्रत्युत्तर दिलं आहे. आता पाकिस्तानला चांगला धडा मिळाला आहे. जर अजूनही त्यांनी धडा घेतला नसेल तर मोदी याहून कठोर पावलं उचलतील याची खात्री आहे, अशी प्रतिक्रया संगीता गनबोटे यांनी दिली आहे. कौस्तुभ गनबोटे हे त्यांची पत्नी संगीता, संतोष जगदाळे, त्यांची पत्नी आणि जगदाळेंची मुलगी असे सर्वजण काश्मीरला फिरायला गेले होते. यावेळी २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम इथं दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्या २६ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात पुण्यात राहणाऱ्या कौस्तुभ गनबोटे यांचाही मृत्यू झाला होता.

# श्यामची आई चित्रपटात साने गुरुजींची भूमिका साकारणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्याचे निधन



**पुणे । प्रतिनिधी**

श्मामची आई या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणारे ज्येष्ठ अभिनेते व नाटकार माधव वझे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्यामागे पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. त्यांचे बुधवारी निधन झाले आहे. श्मामची आई या राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त चित्रपटात माधव वझे यांनी छोट्या साने गुरुजींची भूमिका साकारलेली होती. त्यांच्या त्या बालवयातील अभिनयाचे भरभरून कौतुक झाले होते.

कोण होते माधव वझे?

जेष्ठ नाटककार आणि अभिनेते माधव वझे यांचा जन्म २१ ऑक्टोबर १९३९ रोजी पुण्यात झाला. येथील वाडिया कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून नोकरी केली. त्यांच्या नावावर अनेक पुरस्कार आहेत. अनेक नाटकांसाठी त्यांनी लेखन देखील केले आहे. मराठीबरोबच वझे यांनी डिअर जिंदगी आणि थ्री इडिएट्स या चित्रपटात देखील काम केले आहे. अभिनेता, दिग्दर्शक, नाट्यगुरू आणि नाट्य समीक्षक अशी ओळख माधव वझे यांना लाभलेली होती. परशुराम देशपांडे यांनी मराठीत रूपांतरित केलेल्या शेक्सपियरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे दिग्दर्शन माधव वझे यांनी केले होते.

# पोलीस उपनिरीक्षकपदाची निवड यादी

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक या पदाची तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये अतिश मोरे या उमेदवाराने सर्वाधिक गुणांसह राज्यात प्रथम अव्वल क्रमांक पटकावला आहे.

आयोगाने पीएसआय संवर्गातील ३७४ पदांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी परीक्षा घेण्यात आली होती. गेल्या दीड वर्षापासून उमेदवारांना या निकालाची प्रतीक्षा होती. अखेर आयोगाने सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. ही गुणवत्ता यादी उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे. यामध्ये काही दावे खोटे निघाल्यास उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाऊ शकते, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध केल्यानंतर अपात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर करण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात येतो. त्याप्रमाणे महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा २०२३ - पोलीस उपनिरीक्षक तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याकरिता ६ ते १२ मे २०२५ या कालावधीत वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे आयोगाकडून सांगण्यात आले आहे.

# चारचा प्रभाग, चारच नगरसेवक वाढणार

**पुणे । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महापालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाने २०२२ पूर्वीच्या प्रभाग रचनेनुसारच या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पुण्यातही चार सदस्यांचाच प्रभाग राहणार आहे. मात्र, नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमुळे प्रभाग रचना नव्याने होण्याची दाट शक्यता आहे. प्रभागांची संख्या ४२ असणार आहे, तर नगरसेवकांची संख्या १६६ असण्याची शक्यता आहे. मागील सभागृहात १६२ सदस्य होते. केंद्र शासनाकडून २०२१ ची जनगणना जाहीर केलेली नसल्याने या निवडणुका पुन्हा २०११ च्या लोकसंख्येनुसारच होणार असल्याने नगरसेवकांच्या संख्येवर त्याचा मोठा परिणाम होणार आहे.



प्रभाग रचनेवर लक्ष

२०१७ मध्ये महापालिकेत ११ गावांचा समावेश करण्यात आला होता. मात्र, त्यापूर्वीच निवडणुका झाल्याने या ११ गावांसाठी एक नगरसेवक निवडण्यात आला. त्यानंतर पुन्हा मार्च २०२२ मध्ये होणाऱ्या महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महापालिकेत २३ गावांचा समावेश करण्यात आला. मात्र, नंतर निवडणुका लांबल्याने फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे वगळण्यात आली आहेत. त्यामुळे शहराची प्रभाग रचना नव्याने होण्याची चिन्हे आहेत. त्यातच २०२२ मध्ये करण्यात आलेल्या प्रभाग रचनेत मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप झाला होता. आता राज्यात महायुतीत तीन पक्षाचे सरकार आहे, तसेच हे तिन्ही पक्ष एकत्र लढणार असल्यास सोयीच्या प्रभाग रचनेसाठी मारमार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तीन वर्षांत नेमके झाले काय?

महापालिकेच्या सभागृहाची मुदत १४ मार्च २०२२ रोजी संपली. त्याच्या सहा महिने आधीच निवडणुकीची प्रक्रिया सुरू होती. याच दरम्यान राज्यात ओबीसी आरक्षणाची सुनावणी, तसेच राज्यातील सत्तानाट्य सुरू होते. महापालिकेची २०१७ ची निवडणूकही चार सदस्यीय प्रभाग रचनेतून झालेली होती. २०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर त्यांनी मुंबई वगळता अन्य महापालिकांमध्ये तीन सदस्यांचा प्रभाग करण्याचा निर्णय घेतला, तसेच नगरसेवकांची संख्याही वाढविण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार पुणे महापालिकेत ५८ प्रभागांमध्ये १७३ नगरसेवक असतील, हे स्पष्ट झाले.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेने नागरिकांच्या हरकती सूचना मागवून, त्यावर सुनावणी घेऊन ही प्रभाग रचना अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र, वारंवार बदलण्यात येणाऱ्या निर्णयावरून न्यायालयात याचिका दाखल झाल्याने निवडणुका रखडल्या, तसेच प्रभाग रचनाही रखडली होती. असे असतानाच पुन्हा राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महापालिकेत चारचा प्रभाग असेल, असा निर्णय घेतला. मार्च महिन्यात हे विधेयक विधिमंडळात मंजूरही केले; पण न्यायलयीन सुनावणी सुरू असल्याने त्यावर काहीच कार्यवाही झाली नाही.

# 'माझे वडील'... आसावरीने पुन्हा काळजाला हात घातला, भारताच्या कारवाईवर व्यक्त केली भावना

**पुणे । प्रतिनिधी**

पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले आहे. बुधवारी (७ मे) रात्री उशिरा भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ले केले.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या सुमारे १५ दिवसांनंतर भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून हा बदला घेतला आहे. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकनंतर भारतीय सैन्याने एअर स्ट्राईकद्वारे केलेला सर्वात मोठा हवाई हल्ला आहे.

पहलगामधील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पुण्याच्या संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे म्हणाली की, आज भारताची कारवाई पाहून माझे वडील जिथून हे सगळं बघत असतील तर त्यांना भारी वाटत असेल, अशी भावना व्यक्त केली.

पुढे बोलताना म्हणाली, पहलगामच्या हल्ल्यात ज्यांना वीरमरण आले, त्यांच्यासाठी सैन्याने आज खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहिली. पहलगाममध्ये स्त्रियांचे कुंकू पुसले गेले होते.



'ऑपरेशन सिंदूर' हे नाव वाचून आम्ही रडत होतो. मोहिमेचा अर्थ जेव्हा आम्हाला उमगला, तेव्हा आम्हाला आमचे अश्रू रोखता आले नाहीत अशा भावना आसावरी जगदाळे हिने व्यक्त केल्या.

तसेच भारताने पाकिस्तानवर कारवाई केली हे आम्ही पहाटे पाहिले. आम्हाला नातेवाईकांचे फोन आले. जे आपल्यासोबत घडले, त्याचा बदला घेतला जातोय. भारताकडून चांगलं प्रत्युत्तर दिलं गेलं, हे आम्हाला समजलं. अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे भारताने पाकिस्तानच्या लष्करावर हल्ला केला नाही. केवळ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. गेल्या १५ दिवसांपासून आम्ही खूप दुःखात होतो, आज आम्हाला आनंदाची गोष्ट कळाली, अशी आसावरी जगदाळे म्हणाली.

.ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकून डोळ्यात पाणी आलं

पहलगामधील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पुण्याच्या संतोष जगदाळे यांच्या पत्नीने भारतीय सुरक्षा दलांनी संयुक्तपणे केलेल्या या मोहिमेवर समाधान व्यक्त केले आहे. एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना प्रगती जगदाळे म्हणाल्या की, दहशतवाद्यांनी ज्या प्रकारे आमचे कुंकू पुसले, त्याला हे एक योग्य प्रत्युत्तर आहे. या ऑपरेशन सिंदूर योग्य नाव दिले आहे. दहशतवाद्यांनी मोदी यांच्या लेकींचे सिंदूर पुसलं. पंतप्रधान मोदी यांना त्याची जाणीव आहे. ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकून डोळ्यात पाणी आलं. मी सरकारचे मनापासून आभार मानते, असे म्हणत त्या भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. जशिीरींळेप डळपवी ।

दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त

भारतीय लष्कराने भारतातील दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन देणाऱ्या जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैय्यबाच्या वरिष्ठ नेतृत्वाला लक्ष्य करण्याच्या उद्देशाने हल्ल्यांसाठी संबंधित ठिकाणे निवडली होती. त्यानंतर हे दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. भारताने केलेल्या या कारवाईमुळे पाकिस्तानने कराची आणि लाहोरचे हवाई क्षेत्र ताबडतोब बंद केले. याशिवाय लाहोर आणि सियालकोट विमानतळ पुढील ४८ तासांसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.